मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/


# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | गुरुवार, ३१ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १३१ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये


## अमित शाहांचे अधिकाऱ्यांना हिंसाचाराचे आदेश!

### कॅनडाच्या परराष्ट्र उपमंत्र्याचा गंभीर आरोप



**ओटावा :** भारताचे गृहमंत्री अमित शहा यांनी कॅनडामधील शीख फुटीरतावाद्यांना लक्ष्य करत हिंसाचार आणि हेरगिरी करण्याचे आदेशच आपल्या अधिकाऱ्यांना दिले, असा आरोप कॅनडाच्या परराष्ट्र विभागाचे उपमंत्री डेव्हिड मॉरिसन यांनी बुधवारी केला. निज्जर या खलिस्तानवाद्याच्या हत्या प्रकरणी सबळ पुरावा नसल्याची कबुली पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांनी दिल्यानंतर कॅनडा सरकारने काही प्रमाणात नमते धोरण स्वीकारले होते. मात्र, आजच्या या मोठ्या आरोपामुळे पुन्हा एकदा वाद चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



28 लाख दिव्यांनी उजळली अयोध्या


पान 8


# आरोपांची फाईल दाखवणे हा गोपनीयतेचा भंग!

## आरआर आबांवरील आरोपांवरुन जयंत पाटलांचा अजितदादांवर हल्लाबोल

प्रतिनिधी
मुंबई

माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्याबाबतीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वादग्रस्त विधान केले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. आर. आर. पाटील यांनी 70 हजार कोटीच्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीच्या फाईलवर सही केली होती, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला होता. तसेच ती फाईल देखील त्यांनी दाखवली होती. यावर महाविकास आघाडीमधील नेत्यांकडून संतप्त प्रतिक्रिया येताना दिसत आहेत.



शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील म्हणाले, ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांनाच ती फाईल घेऊन दाखवणे हा गोपनीयतेचा भंग आहे. आज दुर्दैवाने आर. आर. पाटील हयात नाहीत, ते हयात असते तर त्यांनी याचे उत्तर दिले असते. तेव्हा काय परिस्थिती होती, आम्हाला काही सांगता येत नाही. पण एखादा व्यक्ती हयात नसताना त्यावर त्यावर बोलणे आणि कॉमेंट करणे हे आपण शक्यतो कधी करत नाही. तसेच देवेंद्र फडणवीस तीच फाईल ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांनाच दाखवतात, हे भयंकर आहे.

सुप्रिया सुळे यांनी देखील संतप्त प्रतिक्रिया दिली. घोटाळ्याचे आरोप फडणवीसांनीच केले. त्यांनीच फाईल दाखवली. त्यामुळे 70 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला की नाही हे त्यांनीच सांगावे, असे त्या म्हणाल्या.

# मी निशाणी ढापली नाही

## शिंदेंना 'राज'टोला

मुंबई

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक तोंडावर असताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आज उघडपणे टीका केली. राज ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या



मुलाखतीत त्यांनी एकनाथ शिंदे यांनी पुकारलेलं बंड आणि शिवसेना पक्षावर केलेल्या दाव्यावर टीका केली. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली.

"मी कमवलेली निशाणी आहे, ढापलेली निशाणी नाही. इतक्या वर्षांच्या निवडणुकीच्या प्रवासात मला मिळालेली निशाणी आहे. लोकांच्या मतदानातून ती निशाणी मला मिळालेली आहे. कोर्टातून आलेली निशाणी नाही", असा टोला राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज लगावला.

# ऐन दिवाळीत पुण्यात तिघांकडून गोळीबार

## नवी मुंबईतील उलव्यात स्फोटांचे आवाज

प्रतिनिधी
पुणे/नवी मुंबई

पुण्यात पुन्हा एकदा गोळीबाराची घटना घडली आहे. ऐन दिवाळीत गोळीबाराची घटना घडली. पुण्यातील अलंकार पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

पुण्यात ऐन दिवाळीत तिघाजणांकडून गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. ऐन निवडणूक आणि सणासुदीत घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

### दोघांचा मृत्यू, दोघेजण गंभीर



नवी मुंबईतील उलवेजवळील जावळे गावात ही घटना घडली आहे. अवैधरित्या पेट्रोलची विक्री आणि तसेच साठवणूक करत असलेल्या घरात स्फोट झाल्याची घटना घडली आहे. साठवणूक केलेल्या पेट्रोलचा स्फोट झाल्याची माहिती मिळत आहे. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला आहे. तर दोघेजण गंभीर असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.










## बोरिवलीत बच्चे कंपनीने साकारली प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती

**मुंबई :** दिवाळीनिमित्त आपल्या गडकिल्ल्यांचा इतिहास जपण्याचा प्रयत्न मुंबईसारख्या शहरात केला जातोय. बोरिवली पश्चिम येथील गोराई श्री दर्शन सोसायटीच्या माध्यमातूनही यंदा दिवाळीनिमित्त सोसायटीतील बच्चे कंपनीने प्रतापगडाची प्रतिकृती साकारून श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रतिकृतीत गडावरील केदारेश्वर मंदिर, भवानीमाता मंदिर यांसह बुरुज, गुप्त दरवाजा आणि बालेकिल्ला प्रवेशद्वार ही साकारण्यात आले आहे. दगड, विटा, मातीला रंगरेषांची जोड देत साकारण्यात आलेली किल्ल्याची प्रतिकृती विभागातील नागरिकांना आकर्षित करत आहे.



## थोडक्यात

### सत्पाळा ग्रामपंचायत आर्थिक हलगर्जीपणाचा भांडाफोड

**वसई :** सत्पाळा ग्रामपंचायतीच्या मासिक सभेतील अनियमितता आणि कारभारातील हलगर्जीपणामुळे ग्रामपंचायतीची अखेरची सभा २८ ऑक्टोबर रोजी रद्द करण्यात आली. मागील महिन्यातील २७ सप्टेंबरच्या सभेचे इतिवृत्त आणि ऑगस्ट महिन्यातील जमाखर्चाची नोंद अद्याप न केल्याने, ग्रामपंचायत सदस्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली असून चौकशीची मागणी केली आहे. सत्पाळा ग्रामपंचायतीत मागील अनेक महिन्यांपासून कॅशबुक आणि जमाखर्चासारख्या महत्त्वाच्या आर्थिक नोंदींमध्ये वारंवार अनियमितता येत असल्याचे दिसून आले आहे. २८ ऑक्टोबरच्या मासिक सभेत उपस्थित सदस्यांनी मागील सभेचे इतिवृत्त आणि आर्थिक अहवाल न मिळाल्याने ग्रामपंचायतीला लेखी जाब विचारला. त्यावेळी, ग्रामविकास अधिकारी नितीन राणे यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीचे कॅशबुक जबाबदार असलेल्या किशोर पाटील यांनी अद्याप सादर केले नसल्यामुळे जमाखर्च तयार करणे शक्य झाले नाही.याच सभेत ग्रामसेवकही गैरहजर असल्याने, सभा रद्द करण्याची वेळ येऊन ठेपली. सभेच्या दुसऱ्या दिवशी मात्र कॅशबुक घेऊन ग्रामसेवक ग्रामपंचायतीत आले, परंतु यामुळे ग्रामपंचायतीतील अन्य सदस्यांचा संताप कमी झाला नाही. सभेच्या वेळी गरज असताना संबंधित अधिकारी आणि ग्रामसेवकांची गैरहजेरी यामुळे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत.

### वसई-विरार भाजपा नेत्यावर खंडणीचा गुन्हा

**वसई :** वसई-विरार भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष भुषण नाईक यांच्या विरोधात एका ट्रान्सपोर्ट कंपनीच्या मालकाकडून खंडणी वसुल केल्याच्या आरोपाखाली वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. बिहारी गुप्ता या ट्रान्सपोर्ट कंपनी मालकाच्या तक्रारीनुसार, नाईक आणि त्याच्या तीन साथीदारांनी २८ ऑक्टोबर रोजी सकाळी नवघर येथील त्यांच्या कार्यालयात प्रवेश करून त्यांच्याकडे खंडणीची मागणी केली होती. गुप्ता यांच्या तक्रारीनुसार, सकाळी साडेनऊच्या सुमारास भुषण नाईक व त्याचे तीन साथीदार त्यांच्या कार्यालयात आले आणि टेम्पोत असलेल्या सामानाचे शूटिंग करायला सुरुवात केली. गुप्ता यांनी याबाबत विचारणा केल्यावर, नाईक यांनी सामान अनधिकृत असल्याचा आरोप केला आणि पोलिसांना ताब्यात देऊन कारवाई करण्याची धमकी दिली. नाईक याने सामान महानगरपालिकेकडून जप्त करून गुप्ता यांना जेलमध्ये टाकण्याची आणि गाळा सील करण्याची धमकी दिली.भीती दाखवत त्यांनी गुप्ता यांच्याकडे ५ लाख रुपयांची खंडणी मागितली. पैसे नसल्यामुळे गुप्ता यांनी नाईक यांना साडेतीन लाख रुपये दिले. त्यासाठी नाईक यांच्या दोन साथीदारांनी गुप्ता यांच्यासोबत जाऊन पैसे घेतले. हा व्यवहार झाल्यानंतर नाईक आणि त्यांचे एक साथीदार तेथून निघून गेले. असा आरोप तक्रारदार गुप्ता यांनी असा आरोप केला आहे.

# मलिकांना उमेदवारी, नाराज फडणवीसांचा 'बुलेट पाटलां'ना 'सपोर्ट'

## अजित पवारांच्या सावध पवित्र्याने सस्पेन्स वाढला

प्रतिनिधी
■ मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसने नवाब मलिक यांना उमेदवारी दिल्याने महायुतीत ठिणगी पडली आहे. मलिक यांनी मानखुर्द शिवाजीनगर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्यानंतर उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवारांनी सावध पवित्रा घेत सस्पेन्स वाढवला आहे.

नवाब मलिकांनी 'अंडरवर्ल्ड डॉन' दाऊद इब्राहिमशी व्यवहार केल्याचे आरोप भाजपच्या नेत्यांनी केले होते. मलिक अनेक महिने तुरुंगातदेखील होते. त्यांच्या उमेदवारीला भाजपचा ठाम विरोध होता. पण भाजपचा दबाव झुगारुन देत राष्ट्रवादी काँग्रेसनं त्यांना मानखुर्दमधून उमेदवारी दिली. त्याबद्दल भाजप नेत्यांनी जाहीर नाराजी बोलून दाखवली आहे. 'आम्ही आमची भूमिका स्पष्टपणे राष्ट्रवादीच्या नेत्यांना सांगितली होती. नवाब मलिकांना अधिकृत उमेदवारी देऊ नका. महायुतीत हे चांगल्या प्रकारे घेतले जाणार नाही. तरीदेखील त्यांनी ती उमेदवारी दिली. त्यांच्यासमोर आम्ही शिवसेनेचा उमेदवार दिला. आम्ही तिथे शिवसेनेचे काम करु. भाजप कोणत्याही परिस्थितीत नवाब मलिकांचे काम करणार नाही,' असे फडणवीस म्हणाले.



मानखुर्द शिवाजी नगर मतदारसंघातून शिवसेनेने सुरेश कृष्णराव पाटील यांना उमेदवारी दिली आहे. ते 'बुलेट पाटील' नावाने परिसरात ओळखले जातात. त्यांनी काल भाजपचे नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्यांची भेट घेतली. त्यावेळी सोमय्या यांनी त्यांना पूर्ण पाठिंबा जाहीर केला. आपण पाटलांचा प्रचार करणार असल्याचं सोमय्यांनी ट्विटरवर म्हटलं. आता फडणवीस यांनीदेखील तशीच भूमिका घेतली आहे.

**मलिकांवरील आरोपांबाबत न्यायव्यवस्था निर्णय देईल**
**- अजित पवार**

*मलिक यांच्या उमेदवारीला भाजपचा असलेला विरोध पाहता अजित पवारांनी काहीसा सावध पवित्रा घेतला आहे. 'अर्ज माघारी घेण्याचा दिवस ४ नोव्हेंबर आहे. त्या दिवशी दुपारी ३ वाजता चित्र स्पष्ट होईल, असे पवार म्हणाले. 'मलिकांवर आरोप करण्यात आलेला आहे. त्या आरोपात तथ्य नाही असे आमचे म्हणणे आहे. चौकशी पूर्ण झाल्यावर न्यायव्यवस्था निर्णय देईल. त्यावेळी आपल्याला वस्तुस्थिती कळेल,' अशी पुस्तीही त्यांनी जोडली.*

# शिवसैनिकांची नाराजी, मनसेला मिळणार फायदा?

## नालासोपारात राजकीय गणितं बदलणार ?

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार महानगरपालिकेतील नालासोपारा मतदारसंघाला आगामी विधानसभा निवडणुकीत मोठा राजकीय रंग चढलेला दिसतो आहे. नालासोपारा हा मतदारसंघ स्थानिक आणि परप्रांतीय मतदारांच्या संख्येने महत्त्वाचा असून गेल्या तीन कार्यकाळांपासून बहुजन विकास आघाडीचा (बविआ) बालेकिल्ला राहिला आहे. मात्र यंदा महायुती आणि महाविकास आघाडी यांनी लोकसभा निवडणुकीत येथे मोठे यश मिळवल्यानंतर, या विधानसभेत बविआला कडवे आव्हान मिळण्याची चिन्हे आहेत.

या निवडणुकीत ठाकरे गटाचे नालासोपारा आणि वसई मतदारसंघातील कार्यकर्ते नाराज असल्याचे दिसत आहे. काँग्रेसकडे या दोन जागा गेल्याने ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष पसरला आहे. नालासोपारा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार संदीप पांडे यांच्या उमेदवारी अर्ज भरताना ठाकरे गटाच्या सैनिकांनी गैरहजर राहणे ही नाराजीची ठळक चिन्हे आहेत. या कारणामुळे मराठी मतदारांचे मतं मनसेच्या विनोद मोरे यांच्या पारड्यात जाऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाच्या तिसऱ्या आघाडीचे उमेदवार धनंजय गावडे यांनी मोठ्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यामुळे या निवडणुकीत बविआला आव्हान निर्माण झाले आहे. काँग्रेसने उत्तर भारतीय मतदारांसाठी उत्तर भारतीय उमेदवार उभा केल्याने परप्रांतीय मतांची खेचाताणी होईल, असा अंदाज आहे. मात्र, नालासोपाऱ्यात सेनेचे मोठे बळ असल्याने काँग्रेसच्या उमेदवारास विरोधाची शक्यता आहे. जर ठाकरे गटाची नाराजी दूर करण्यात महाविकास आघाडीला अपयश आले, तर याचा फायदा मनसे आणि अन्य पक्षांच्या उमेदवारांना मिळू शकतो.

सध्या उमेदवारी अर्जांची छाननी सुरू असून 4 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेण्याची संधी आहे. त्यानंतर प्रचाराचा जोर वाढेल. एकूणच नालासोपारा मतदारसंघातील राजकीय स्थिती बदलत असल्याने बविआला आपला गड टिकवण्यासाठी भक्कम प्रचार आणि कार्यकर्त्यांच्या संतुलन साधण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

# 'वंचित'चे उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष प्रकाश अहिरे यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश

■ मुंबई

वंचित बहुजन आघाडीचे उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष प्रकाश अहिरे यांनी आपल्या अनेक समर्थकांसह रिपब्लिकन पक्षात(आठवले) आज जाहिर प्रवेश केला. आज बांद्रा येथील जनसंपर्क कार्यालयात रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे शुभआर्शिवाद घेऊन प्रकाश अहिरे यांनी रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश केला.

वंचित बहुजन आघाडीचे उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष प्रकाश अहिरे यांनी वंचित बहुजन आघाडीला सोडचिठ्ठी देऊन रिपब्लिकन पक्षात प्रवेश केल्याबद्दल प्रकाश अहिरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे रिपब्लिकन पक्षाचे उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष रमेश गायकवाड यांनी पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले)या पक्षात प्रवेश केलेले वंचित बहुजन आघाडीचे उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष प्रकाश अहिरे,जिल्हा उपाध्यक्ष जगन्नाथ सरोदे,जिल्हा सहसचिव अनिल रामभाऊ ससाणे,सचिव सिध्दार्थ खरात,प्रशांत तायडे,सुर्यकांत बानाटे,सुभाष कदम आदि प्रमुख कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडी सोडुन रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश केला.उत्तर मुंबई मध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षात प्रवेश केल्याने उत्तर मुंबईत रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढली आहे.

# मेढे-आंबोडे पूलावर खड्डा ; दोन वर्षांतच जीवघेणी स्थिती

## ठेकेदारांच्या निकृष्ट कामामुळे नागरिकांचा संताप

प्रतिनिधी
■ वसई

तानसा नदीवर दोन वर्षांपूर्वी बांधलेला मेढे-आंबोडे पूल धोकादायक स्थितीत आहे. पुलाच्या मध्यभागी पडलेला मोठा खड्डा नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करत आहे. याआधीच ठेकेदाराने केलेले निकृष्ट काम आणि पुलाच्या अयोग्य बांधकामामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतोष व्यक्त केला जात आहे.

जुना मेढे-आंबोडे पूल पाण्याखाली जात असल्यामुळे वडघर, मेढे, आंबोडे, भिनार आणि कळंभोण गावांचा पावसाळ्यात संपर्क तुटत असे. यामुळे नवीन उंच पुलाची आवश्यकता निर्माण झाली होती. तथापि, दोन वर्षांच्या आत या पुलाला साडेसाती लागली आहे. पुलासाठी करण्यात आलेला भराव खचला असून, पुलाच्या मध्यभागी पडलेला खड्डा त्याला आणखी धोकादायक बनवत आहे. या स्थितीचा विचार करता, पुल कोसळण्याचा धोका वाढला आहे.



पुलाच्या बांधकामाशी संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. ते म्हणतात की, प्रशासनाने या ठेकेदाराला काळ्या यादित टाकावे आणि त्यांच्यावर कारवाई करावी. पालघर लोकसभेचे माजी खासदार बळीराम जाधव यांच्याकडे या भागात राबता असला तरी, पुलाकडे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिकांची चिंता वाढली आहे.

विद्यमान आमदार राजेश पाटील यांच्यावरही नागरिकांनी टीका केली आहे. त्यांनी मागील पाच वर्षांत ग्रामीण विकासावर काय लक्ष दिले, असा संतापजनक प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. ठेकेदार एका विशिष्ट पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यावर पक्षीय कृपा असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. नागरिकांच्या सुरक्षा आणि भल्याबुरे प्रश्नांकडे लक्ष न देता राजकीय नेत्यांनी कसे दुर्लक्ष केले आहे, हे या प्रकरणातून स्पष्ट होते. पूलाच्या देखभालीच्या संदर्भात तात्काळ उपाययोजना न झाल्यास या पुलावरून प्रवास करणाऱ्या हजारो ग्रामस्थांना जीव मुठीत घेऊन चालावे लागणार आहे.



**मुंबई :** बोरीवली पश्चिम विधानसभा क्षेत्र १५२ येथुन संजय वामनराव भोसले यांनी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मराठा क्रांती स्वराज्य संघटना राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले(राष्ट्रीय अध्यक्ष), सुरत येथील उद्योजक विजयराव कदम(राष्ट्रीय सरचिटणीस ) ,बडोद्याचे उद्योजक प्रदीप मोरे (राष्ट्रीय कार्याध्यक्ष )उद्योजक लोकनेते गजाननराव साळुंखे यांच्या सुचनेनुसार मुंबई प्रदेश अध्यक्ष विकासक डॉ चंद्रकांत तुळशीराम मोजाड यांनी ठाकरे सेनेचे उमेदवार संजय भोसले यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

# 'शब्द शंकरपाळी' साहित्यिक समूहाचा वर्धापन दिन प्रभादेवीमध्ये उत्साहात

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठी साहित्य क्षेत्रातील एकमेव ओळख निर्माण करणारा साहित्यिक समूह म्हणजेच "शब्द शंकरपाळी साहित्य समूह, मुंबई." रविवारी २७ ऑक्टोबर रोजी प्रभादेवी, मुंबई येथे या साहित्यिक समूहाचा चौथा वर्धापन दिन आणि दिवाळी अंक प्रकाशन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने प्रज्ञा दळवी आणि सारंग सबनीस यांच्या शुभहस्ते करण्यात आली. त्यानंतर सृष्टी कोठवदे यांनी सरस्वती स्तवन गायल्याने कार्यक्रमाची रंगत अजून वाढली. या दरम्यान भूषण सहदेव तांबे यांचे संपादकीय मनोगत झाल्यावर दिवाळी अंकाचे प्रकाशन प. सा. म्हात्रे यांच्या शुभहस्ते झाले.



कार्यक्रमाचे दुसरे सत्र होते सत्कार समारंभ आणि गुणगौरव सोहळा. उपस्थित साहित्यिकांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, भेटवस्तू, फराळ, आणि दिवाळी अंक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून साहित्यिकांनी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती नोंदविली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शलाका कोठावदे आणि प्रदीप बडदे यांनी केले तर मृगनयना भजगवरे, दीपक जाधव, निलेश खरात, शितल मदने, शुभांगी बोकेफोड, सुरज तांबे, प्रज्वल कुसुरकर यांचे विशेष सहकार्य लाभले.या साहित्यिक सोहळ्यात पद्माकर भावे, भास्कर आग्रे, शुभांगी कुलकर्णी, सुमती नलावडे, रोहिणी टाकळकर, हरिश्चंद्र धिवार इत्यादी सदस्य उपस्थित होते आणि त्यांनी त्यांचा वैयक्तिक अभिप्राय कार्यक्रमात नोंदवून या साहित्यिक समूहास आणि दिवाळी अंकासाठी खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र राज्य लॉटरीची दिवाळी भव्यतम सोडत

# ग्राहकांसोबत यंदा विक्रेत्यांचीही दिवाळी - सातार्डेकर

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्य लॉटरी विभागाच्या भव्यतम दिवाळी बक्षिसांच्या सोबतच विक्रेत्यांचीही दिवाळी होणार आहे! ही योजना महाराष्ट्र राज्य लॉटरी संघटना लॉटरी विक्रेत्यांसाठी राबविणार आहे. लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते आणि महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विलास सातार्डेकर यांनी आवाहन केले आहे की महाराष्ट्राची शासकीय अधिकृत लॉटरीची विक्रमी विक्री करावी, त्यामुळे ग्राहकांना कोट्यावधीची बक्षिसे आणि यंदा सोबतच विक्रेत्यांनाही बक्षीसांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे दिवाळी भव्यतम सोडत खरेदी करावी लागणार आहे. उभ्या देशभरात पारदर्शक प्रतिष्ठित आणि गौरवशाली परंपरा असलेल्या दिवाळी भव्यतम सोडतीचे ग्राहक तसेच विक्रेते यांच्यात आकर्षण आहे. लॉटरी विक्रेता संघटनेतर्फे विक्रमी विक्री होण्यासाठी यंदा ही अभिनव योजना हाती घेण्यात आली आहे. २५ तिकीटांची खरेदी करणाऱ्या विक्रेत्यांना (एजंट) आकर्षक रोख बक्षिसे असणारे कुपन भेट मिळणार आहे. जाहीर झालेल्या सोडतीच्या निकालावर या बक्षिसांचे नियोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.



या कुपनातून पहिले बक्षीस ५० हजार (१० हजारांची ५ बक्षिसे) निकालाच्या चौथ्या बक्षिसावर, दुसरे बक्षीस ५० हजारांची (५ हजारांची १० बक्षीसे) निकालाच्या पाचव्या बक्षिसावर, तिसरे बक्षीस २० हजार (२ हजारांची १० बक्षिसे) निकालाच्या सहाव्या बक्षिसावर, चोथे बक्षीस १० हजारांची (१ हजाराची १० बक्षिसे) निकालाच्या सातव्या बक्षीसावर अशी या बक्षिसांची रचना आहे विक्रेत्यांनी २५ तिकीटांवरचे कुपन वितरकांकडून घ्यावे. या संदर्भात अधिक माहितीसाठी विक्रेत्यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा अशी माहिती महाराष्ट्र राज्य लॉटरी संघटनेचे संस्थापक, अध्यक्ष विलास सातार्डेकर यांनी दिली आहे. याबाबत अधिक माहितीसाठी संघटनेचे सरचिटणीस राजेश बोरकर 9004471885, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा 8928412258 यावर संपर्क साधावा.

# पालिकेत लागू करण्यात येणाऱ्या वैद्यकीय गटविमा योजनेत संवर्गनिहाय भेदभाव दूर करा

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कामगार-कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सामुदायिक वैद्यकीय गटविमा योजना लागू करताना वैद्यकीय उपचाराकरीता संवर्गनिहाय करण्यात आलेला भेदभाव दूर करून समान न्यायतत्वानुसार सामुदायिक वैद्यकीय गटविमा योजना कार्यान्वीत करणेबाबत सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्यात यावे अशी मागणी मुंबई महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना समन्वय समिती ने पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

पालिका प्रशासनाने परिपत्रकान्वये वैद्यकीय गटविमा योजना सुरू करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कामगार, कर्मचारी, अधिकारी यांच्यामध्ये भेदभाव करण्यात आला आहे, त्यामुळे कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे. सामुदायिक वैद्यकीय गटविमा योजनेमध्ये वैद्यकीय गटविमेचा लाभ देताना 'अ' संवर्ग कर्मचारी / 'ब' संवर्ग कर्मचारी / 'क व ड' संवर्ग कर्मचारी यांच्या श्रेणीनुसार दर आकारण्यात आलेले आहेत. वास्तविक रुग्णांना आजारपणामध्ये वैद्यकीय उपचार/ शस्त्रक्रीया यांचा खर्च त्यांच्या श्रेणीप्रमाणे केला जात नसून त्यांना झालेल्या आजाराच्या पार्श्वभूमीवर आकारला जातो. त्यामुळे कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना वैद्यकीय उपचार करताना केला जाणारा भेदभाव हा अन्यायकारक आहे. तसेच विविध आजारावर लावण्यात आलेली खर्चाची मर्यादा ही फारच अल्प असल्यामुळे कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारामध्ये पदरचे पैसे जास्त अदा करावे लागत आहेत. परिणामी कामगार, कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झालेला आहे. कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांमध्ये असलेल्या तीव्र संतापाचे रुपांतर आंदोलनात होऊन औद्योगिक शांतता भंग पावण्याची शक्यता नाकारता येत नाही असे झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही प्रशासनावर राहील याची कृपया नोंद घ्यावी. असा इशारा समन्वय समितीने दिला आहे.

# मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय मित्तल हॉस्पिटल इमारतीत स्थलांतरित

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे चर्नी रोड येथील मित्तल आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या आठव्या मजल्यावरील जागेत स्थलांतर झाले आहे. त्यामुळे या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना 'विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई, मित्तल फाउंडेशन ट्रस्ट आयुर्वेदिक हॉस्पिटल इमारत, आठवा मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड रेल्वे स्टेशन जवळ, कैवल्यधाम योगा केंद्राच्या पाठीमागे, मरीन ड्राईव्ह, मुंबई – 400002' या पत्त्यावर पत्रव्यवहार करण्यात यावा, असे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

सर्व अधिनस्त कार्यालये, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (माध्यमिक) जिल्हा परिषद / मनपा, प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालये, मुख्याध्यापक, पालक, विद्यार्थी यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांनी केले आहे.

# पंचरत्न मित्र मंडळाचे आरसीएफच्या सहकार्याने भव्य आरोग्य शिबीर

## सुमारे 300 नागरिकांनी घेतला लाभ



प्रतिनिधी
■ मुंबई

पंचरत्न मित्र मंडळ व राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी गाव चेंबूर येथे स्थानिक नागरिकांकरिता वैद्यकीय शिबिराचे आयोजन नुकतेच वाशीग्राम सभागृह मंडळात करण्यात आले होते .२५०ते ३०० नागरिकांनी वैद्यकीय शिबिराचा लाभ घेतला . या कार्यक्रमात रक्तदान, रक्तदाब, शुगर तपासणी पीएफटी टेस्ट इत्यादी तपासणी करून मोफत औषधे व चष्मा वाटप करण्यात आले

निरंजन सोनक (कार्यकारी संचालक वाणिज्य ,आरसीएफ )तसेच मधुकर पाचारणे (महाव्यवस्थापक, आरसीएफ ) चेंबूर व वाशी ग्रामसेवक मंडळाचे अध्यक्ष माणिक पाटील व सेक्रेटरी धनंजय ठाकूर आणि हर्षाली शिंदे हे मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमात वैद्यकीय समाजसेवक राजकुमार घाडी , सुराना हॉस्पिटल चेंबूर यांची टीम तसेच तज्ञ डॉक्टर विनीत गायकवाड डॉक्टर नीलम सराफ, डॉक्टर सुधाकर पाटील हे उपस्थित होते.

शिबीर यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष अशोक भोईर यांच्या सहित सचिव प्रदीप गावंड , उपाध्यक्ष रमेश पाटील, खजिनदार सचिन साळुंखे, हनुमंता चव्हाण,सौ नीलम गावंड, प्रकाश शेजवळ रहिम शेख, मंदार भोपी, डीएम मिश्रा, तुकाराम वने, वैभव घरत, संदीप पाटील, सतिश कुंभार, सचिन राखाडे, रमाकांत गावंड, सौ संध्या गावंड, मॅथ्यू डिसोजा या कार्यकर्त्यांनी खूप परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सुशिलकुमार मिस्त्री यांनी केले.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 131**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १३१**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

# महाराष्ट्राची दिवाळी देशात सर्वाधिक महागडी

## वीज वापराचे दर इतर सर्वच राज्यांपेक्षा अधिक

सुनील ओसवाल
■ मुंबई

यंदा दिवाळीची रोषणाई इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात सर्वात महागडी ठरणार असून कारण महाराष्ट्रात वीज वापराचे दर अन्य सर्व राज्यांपेक्षा अधिक आहेत. राज्यात दिवाळीसाठी प्रकाशोत्सव सुरू झाला आहे. रोज लागणारा आकाशकंदील, टिमटिमत्या 'सिरीज'चा लखलखाट, घरासह अंगणातही उजेडाची तजवीज केली जात आहे. पण यंदा हा उजेडाचा सोस आवरावा लागणार आहे. घरगुती वीज ग्राहकांना १०० युनिटपर्यंत आणि दुकानदारांना साधारण ३०० युनिटपर्यंत वीज वापरासाठी सवलतीचे दर लागू आहेत. परंतु, दिवाळीत विजेचा वापर साहजिकच या मर्यादेपेक्षा पुढे जाणार आहे. त्यामुळे घसघशीत दर लागू होणार आहेत. त्यामुळे दिवाळीतील रोषणाई आटोक्यात ठेवण्याची गरज आहे. नाहीतर आधीच इतर राज्यांपेक्षा अधिक असलेले दर दिवाळीत तुमचे तेल काढल्याशिवाय राहणार नाहीत. तर दुसरीकडे, महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने याबाबत 'अपेक्षानामा' जाहीर करत हे दर कमी करण्यासाठी निवडणुकीतील उमेदवारांना साकडे घातले आहे.

**वीज 'सरप्लस', तरी जादा दराचा भुर्दंड**

महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेच्या म्हणण्यानुसार, यावर्षी राज्यात ३९ हजार दशलक्ष युनिट्स म्हणजेच किमान साडेपाच हजार मेगावॉट वीज सरप्लस आहे. म्हणजेच शिल्लक आहे. पण या वीज निर्मिती क्षमतेच्या स्थिर आकारापोटी राज्यातील प्रत्येक ग्राहकाला प्रती युनिट ५० पैसे जादा दराने बिल आकारले जात आहे. असे असताना स्थानिक कारणांमुळे दररोज वीजपुरवठा कुठे एक तास तर कुठे दोन तास खंडित होत आहे. त्यामुळे एकीकडे कंपनीचा वार्षिक महसूल पाच हजार कोटीने कमी गोळा होता, तर दुसरीकडे ग्राहकांनाही भुर्दंड पडतोय. हे नुकसान टाळण्यासाठी पायाभूत सुधारणा करून अखंडित वीज पुरवठा करावा, अशी मागणी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी केली आहे.



**राज्यनिहाय वीज वापराचे दर (घरगुती / वाणिज्यिक)**

| राज्य | इनिशिअल स्लॅब | लास्ट स्लॅब |
|---|---|---|
| महाराष्ट्र | ५.८८/९.६९ | १७.८१ / १६.५५ |
| गुजरात | ३.०५/४.३५ | ५.२०/४.७० |
| मध्यप्रदेश | ४.२७/६.३० | ६.८०/७. ८० |
| राजस्थान | ४.७५/७.५५ | ७.९५/८.९५ |
| उत्तर प्रदेश | ६.५०/७.५० | ६.५०/८.७५ |

# निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत 187 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते ३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली.

निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या राज्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणांनी ही कामगिरी केली आहे. विविध ठिकाणी पोलीस विभाग आणि इतर यंत्रणांनी उभारलेले तपासणी नाके योग्य पध्दतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे. यामध्ये प्रामुख्याने राज्य पोलीस विभागाने सुमारे ७५ कोटी रूपये, इन्कमटॅक्स विभागाने सुमारे ६० कोटी रूपये, राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुमारे ११ कोटी रूपये यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी-व्हिजील' ॲपवर तक्रार करता येते. या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.




**मुंबई ।** अंधेरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- रिपाई महायुतीचे उमेदवार मुरजी पटेल यांनी मंगळवारी आपला निवडणूक अर्ज भरला आहे. यावेळी माजी खासदार संजय निरुपम यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते भव्य रॅलीमध्ये सामील झाले होते. मुरजी पटेल यांनी नुकतेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. अंधेरी पूर्व विधानसभा क्षेत्रात पटेल यांच्या उमेदवारीमुळे निवडणुकीत रंगत आली आहे.

### *मुंबईत २२९ किलो बेकायदा फटाके जप्त*

*__मुंबई ।__ मुंबई महापालिका हद्दीत बेकायदा फटाके विक्रीविरोधात २५ तारखेपासून केलेल्या कारवाईत २२९ किलो फटाके जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई विविध विभागांत मंगळवारी करण्यात आली. पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, जी- दक्षिण विभागात २२ किलो, एल विभागात १८ किलो, आर- दक्षिण विभागात १८ किलो, टी विभागात १६ किलो, एफ- दक्षिण विभागात साडेदहा किलो फटाके जप्त करण्यात आले. विशेष म्हणजे ए, सी, जी- उत्तर, एच- पश्चिम, पी-उत्तर, एम- पूर्व, एन या विभागांत जप्तीची कोणतीही कारवाई झालेली नाही. डी विभागात चार किलो, तर एफ-उत्तर विभागात सहा किलो, तर एच-पूर्व विभागात साडेसहा किलो, आर-मध्य विभागात पाच किलो, एस विभागात साडेतीन किलो इतक्या अल्प प्रमाणात बेकायदा फटाके मिळाले आहेत.*























कर्तव्यदक्ष माणूस कधीही निराश होत नाही म्हणून जोपर्यंत जिवंत आहेत तो पर्यंत कर्तव्य करत रहा.



- सरदार वल्लभभाई पटेल

वृत्तमानस
मुंबई, गुरुवार, ३१ ऑक्टोबर २०२४

# हवा प्रदूषित नका करू

प्रत्येक वर्षी दिवाळी आली की प्रदूषणकारी फटाके फोडू नका, हे आवाहन सातत्याने ऐकायला मिळते. या फटाक्याने पर्यावरणाची हानी होते. फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण याचीही चर्चा जोरदार सुरू होते. यातच या फटाक्यांमुळे मानवी जीवाला किती धोका आहे, हे बुधवारी पहाटे एका मंदिर परिसरात झालेल्या फटाक्यांच्या स्फोटात स्पष्ट झाले. असे असले तरी या सर्वांकडे कानाडोळा करीत सण आहे आम्ही फटाके फोडणारच, अशी दुराग्रही भूमिका घेण्याची प्रवृत्ती वाढतच चालली आहे. वास्तविक आधीच देशातील बहुतांश शहरांतील हवेची गुणवत्ता खालावली आहे. त्यात या फटाका प्रदूषणाने भर पडणार आहे. फटाक्यांमुळे प्रदूषण होते. हवेतील धूळ आणि पॉप्युलेट्सच्या संख्येत फटाक्यांमुळे वाढ होते. फटाक्यांमध्ये असलेले वेगवेगळी केमिकल स्फोट झाल्यानंतर हवेत मिसळतात. त्यामुळे केवळ प्रदूषणच होते असे नाही तर आरोग्यासाठीही हे धोकादायक आहेत. फटाक्यांमुळे वातावरणातील उष्णतेसह कार्बन डायऑक्साइड आणि इतर विषारी वायूंचे प्रमाण वाढते. या दूषित हवेमुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होते. मोठ्या आवाजाचा थेट प्रभाव मानवी आयुष्यावर पडतो. यामुळे वृद्ध लोकांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता जास्त असते. गर्भवती महिला आणि त्यांच्या गर्भातील बाळाच्या आरोग्यालादेखील यामुळे धोका बळावतो. मोठी आग लागण्यासाठी एक ठिणगीदेखील पुरेशी असते. त्यामुळे फटाक्यांना योग्यरीत्या न हाताळल्यास मोठ्या आगीच्या घटना घडण्याची शक्यता जास्त असते. यामुळे बाह्य नुकसानासोबतच श्वसनाच्या आजारांचाही सामना करावा लागू शकतो. एवढेच नव्हे तर दिवाळीच्या दिवसांमध्ये मुक्या प्राण्यांचे अतोनात हाल होतात. फटाक्यांच्या आवाजामुळे प्राण्यांचे शरीर जास्त प्रमाणात थरथरते, शिवाय त्यांच्या ओरडण्यामध्ये वाढ होते. आवाज आणि धुरामुळे प्राण्यांमध्ये मनोविकृतीदेखील बळावते. पाच वर्षांपूर्वी फटाक्यांवर पूर्ण बंदी घालावी, या मागणीसाठी सुप्रीम कोर्टात याचिका करण्यात आली होती. त्या वेळी सगळे जण फटाक्यांच्या मागे का लागले आहेत, असा प्रश्न कोर्टाने उपस्थित केला होता. खरंतर फटाक्यांपेक्षा जास्त प्रदूषण वाहनांमुळे होते, असे निरीक्षणही नोंदवले गेले होते. फटाक्यांवर बंदी घातल्याने निर्माण होणाऱ्या बेरोजगारीबाबत चिंता व्यक्त करताना बंदी घातल्यास फटाका व्यवसायातील बेरोजगारांना पर्यायी रोजगार सांगायला हवा. आपण जनतेला बेरोजगार आणि उपाशी ठेवू शकत नाही. जर फटाक्याचा व्यापार वैध असेल, त्याला परवाने आहेत तर त्यावर बंदी कशी आणता येईल, असा सवालही कोर्टाने केला होता. अर्थात याच्या दोन्ही बाजू पाहूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. या सर्वांवर पर्याय म्हणून पर्यावरणपूरक फटाकेसुद्धा बाजारात आणण्यात आले. असे असले तरी ते घेण्याकडे अनेकांचा कल नसतो. मुंबईसह ठाण्यामधील हवेचा दर्जा हा सध्या खालावला आहे. विशिष्ट वेळेत फटाके उडवण्याचे नियम असले तरी ते धाब्यावर बसवले जातात. विशेषतः लक्ष्मीपूजन काळात तर फटाक्यांचा अतिरेक होतो. एरव्ही हवेतील धुलिकणांचे पीएम २.५ आणि पीएम १० अशा दोन आकारांत वर्गीकरण केले जाते. अडीच मायक्रॉनपेक्षा कमी व्यास असणाऱ्या कणांना पीएम २.५ म्हणतात, तर २.५ ते १० मायक्रॉन एवढा आकार असणाऱ्या प्रदूषकांना पीएम १० म्हणतात. हे कण उघड्या डोळ्यांना दिसत नाहीत. त्यामुळे ते अगदी सहज नाकावाटे किंवा घशामधून शरीरात जातात. त्यामुळे दमा, हृदयविकार, ब्राँकायटिस आणि श्वसनाचे इतर आजार होऊ शकतात. फटाके उडवल्यानंतर त्यातून मोठ्या प्रमाणावर पीएम २.५चे कण हवेत पसरतात आणि ते दीर्घकाळ हवेतच साचून राहतात. मुळात फटाक्या शिवाय दिवाळी ही कल्पनाच काहींना करवत नाही. कारण दिवाळी आणि फटाके यांची संलग्नता मेंदूमध्ये ठामपणे कोरली गेली आहे. पिढ्यान्पिढ्या ती संक्रमित होत गेली आहे. कालसुसंगत नसलेल्या अनेक प्रथा-परंपरा आज पाळल्या जातात. खरंतर कालबाह्य रूढी-परंपरा या एक प्रकारच्या अंधश्रद्धाच आहेत. मनाला वाटणाऱ्या असुरक्षिततेमुळे ते मोडण्याचे धाडस आज बऱ्याच लोकांना होत नाही. दिवाळीनंतर फटाके फोडल्यामुळे हवेची गुणवत्ता खूप खराब होते. तसेच वातावरणात गारवा पडत जातो. हवेतील आर्द्रता वाढल्याने बराच काळ धूळ हवेत राहते. नुकतेच एका संशोधनातून असे समोर आले आहे की, हवेतील विषारी कण पोटात वाढणाऱ्या मुलाच्या फुप्फुसात आणि मेंदूमध्येही आढळून आले आहेत. विशेषतः दमा रुग्ण, हृदयरोगी किंवा गर्भवती महिलांनी वायू प्रदूषण टाळण्याची आवश्यकता आहे. भारत हा विकसनशील देश आहे. येथे विकास आणि प्रगतीच्या वाटेवर अनेक उद्योग-व्यवसाय वाढीस लागत आहेत. यामुळे या उद्योगांचा सुमारे ५१ टके इतका वाटा प्रदूषणात आहे, ही बाब अजिबात विसरून चालणार नाही. एक माहितीनुसार जगातील ३० सर्वात प्रदूषित शहरात आपल्या देशातील २१ शहरांचा समावेश आहे. दरवर्षी किमान दोन दशलक्ष लोकांना या प्रदूषणाचा मोठा त्रास होत असून, त्यामध्ये भर पडत चालली आहे. यामध्ये बालक व वृद्ध लोकांचा समावेश आहे. त्यातच दीपावली सणात फटाक्यांच्या अतिरेकी आतषबाजीने हे प्रदूषण चौपट वाढते. उत्तर भारतामध्ये विशेषतः दिल्लीसारख्या ठिकाणी हिवाळ्यामध्ये हवेतील प्रदूषण ही एक बिकट समस्या बनत असते. धुक्यासारखी दिसणारी परंतु प्रत्यक्षात प्रदूषणामुळे निर्माण होणारी धुंद येत्या हिवाळ्याच्या दिवसांत दिल्ली व आसपासच्या पठारी प्रदेशांमध्ये पसरलेली सर्रास पाहायला मिळते. विमान उड्डाणानेसुद्धा त्यामुळे रद्द करावी लागतात. पंजाब आणि हरियाणासारख्या शेतीप्रधान राज्यांमध्ये पिकांची कापणी झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात जाळल्या जाणाऱ्या तणामुळे हवेत पसरलेला धूर दिल्लीपर्यंत येऊन दिल्लीची हवा प्रदूषित करीत असल्याचा विषय तर जुनाच आहे. त्यामुळे सर्वो च्च न्यायालयाने त्यात फटाक्यांची भर नको म्हणून हरित फटाक्यांचा पर्याय दिलेला होता. मात्र या वेळी राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार हरित फटाक्यांसह सर्व प्रकारच्या फटाक्यांवर बंदी आली आहे. अशी बंदी अनेक राज्यांनी घातली असली तरी त्याची कठोर अंमलबजावणी होताना दिसत नाही. फटाक्यांच्या वापराला आळा घालायचा असेल तर खरे म्हणजे कायदेशीर बंदीपेक्षा नागरिकांमधील जनजागृती अधिक महत्त्वाची भूमिका बजावेल. फटाक्यांतून सोडल्या जाणाऱ्या विषारी धुराचे मानवी आरोग्यावर किती घातक परिणाम होतात याची माहिती जनसामान्यांपर्यंत सातत्याने गेली पाहिजे. विशेषतः शालेय मुलांमध्ये ही जाणीवजागृती झाली तर उद्याची पिढी फटाक्यांपासून आपोआप दूर जाईल. हरित फटाक्यांतून सोडला जाणारा सल्फर डायऑक्साइड किंवा नायट्रोजन ऑक्साइड हा नेहमीच्या फटाक्यांपेक्षा तीस टक्के कमी असतो, हे खरे असले तरी मोठ्या प्रमाणावर हे फटाके फोडले जातात तेव्हा शेवटी लेखाजोखा एकच होतो. त्यामुळे फटाक्यांचा दणदणाट करून आणि प्रचंड धूर निर्माण करून त्यातून आसुरी आनंद मिळवण्याची ही प्रवृत्तीच मुळात नाहीशी झाली पाहिजे. फटाकेबंदीचा विषय केवळ दिवाळीपुरताच महत्त्वाचा नाही. भारतामध्ये गन पावडरचा वापर सुरू झाला तेव्हापासून म्हणजे पंधराव्या शतकापासूनच दिवाळीमध्ये फटाके फोडण्यास सुरुवात झाली असावी, असे इतिहास संशोधकांचे म्हणणे आहे. आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून जर हा विषय ऐरणीवर आणला गेलेला असेल तर तो सर्वांना सारखाच लागू व्हायला हवा. सुरुवात तर ती राजकारण्यांपासून करायला हवी. कारण प्रत्येक निवडणुकीतील विजयानंतर फटाक्यांचा दणदणाट करण्यात नेतेमंडळी आणि त्यांचे अनुयायीच सर्वात पुढे असतात. खेळातील विजयानंतरदेखील रात्री-बेरात्री फार मोठ्या प्रमाणात फटाके लावून विजयोत्सव साजरा करण्याची प्रथा पडली आहे. त्यातून आजूबाजूच्या लोकांना विशेषतः रुग्णांना होणाऱ्या उपद्रवाचा विचारही अशा प्रसंगी संबंधितांकडून केला जात नाही.

# दिपावली नावाचे दिवे आणि तोरणे !




**मकरंद करंदीकर**

दिवाळी आली म्हणजे शेतीसाठी केलेल्या श्रमांचे पूर्णत्व, शेतातील पिके तयार, फळफळावळ तयार, पाण्याची मुबलकता, हिरवीगार समृद्ध पृथ्वी, पावसाळा संपून सुखद थंडीकडे वाटचाल अशा विविध मार्गाने समृद्धीचे संकेत मिळू लागतात.

आपल्या धर्माचे पूर्वापार सगळे कसे सांकेतिक असायचे. सजीवांचे व्यवहार हे भगवान विष्णूंच्या अधिपत्याखाली येतात. चातुर्मासामध्ये भगवान विष्णु शयन करतात. म्हणजेच ते तुमच्या देखभालीसाठी उपलब्ध नसतात. म्हणून या चार महिन्यांमध्ये आहार नियमन, बदल, सदाचरण, व्रतवैकल्यांनी स्वतःच स्वतःला सांभाळण्याचा हा काळ असतो. महाराष्ट्रातील गरीब वारकरी शेतकरी, आपल्या शेतीची प्राथमिक कामे करून आषाढीला वारी करतात. देव झोपण्याआधी त्याला साकडे घालून येतात. पिके आली की पुन्हा कार्तिकी वारी करून देवाचे आभार मानून येतात. आता ही भगवंताची निद्रा म्हणजे तरी काय ? तर शेतीची कामे आणि पावसामुळे आपल्या जीवनातील अन्य अनेक गोष्टी, व्यवहार, समारंभ, प्रवास इ. बंद राहतात. एकदा देवच निद्रेत आहे असे म्हटले की या गोष्टी बंद राहण्यासाठी धार्मिक आधार मिळत असावा. कार्तिकी एकादशीला विष्णू भगवान निद्रेतून जागे झाल्यावर या गोष्टींना पुन्हा सुरुवात होत असे. त्याआधीची दिवाळी म्हणजे भगवान विष्णू, महालक्ष्मी आणि त्यांचे अवतार यांचा मोठा उत्सव असतो. गोपाळकृष्णाच्या गोधनाची म्हणजे गाय वासराची प्रतीकात्मक पूजा, गोवर्धनपूजन, भगवान धन्वंतरीची धनत्रयोदशी, भगवान श्रीकृष्णांनी नरकासुराचा वध केला ती नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, वामनावताराची बलीप्रतिपदा असे हे सगळे विष्णू संबंधित उत्सव ! विश्वाचा विनाश, महामृत्यू जरी शंकराच्या हातात असला तरी अपमृत्युपासून रक्षणकर्ता विष्णूच ! म्हणून मग या विष्णूच्या उत्सवात यमदीपदान, यमद्वितीया यांच्याद्वारे यमाचीही आठवण ठेवली जाते. इतर प्रादेशिक परंपरा ह्या सणाला दुर्गा, शिव, काली, हनुमान, कुबेर, यम, यमी, विश्वकर्मा यांच्याशी जोडतात. जैनांची दिवाळी ही महावीरांच्या अंतिम मुक्तिचे प्रतीक आहे. गुरू हरगोबिंद यांची मुघलांच्या तुरुंगातून सुटका झाल्याबद्दल शीख धर्मीय बंदिछोर ( बंदी छोड) दिवस साजरा करतात.

यासाठी अर्थातच गोडधोड पदार्थ, विविध पूजाविधी, रांगोळ्या, तसेच दीपोत्सव साजरा केला जातो. भारतात नेमका या काळात सूर्यास्त लवकर होऊन अंधार पसरतो. त्यामुळे उजळलेले दिवे अधिक शोभिवंत दिसतात. एका रांगेत हजारो दिवे उजळण्याची परंपरा भारतभर पाळली जाते. पणती बनवितांना माती पाण्यात कालवून दिवा बनविणे, तो भट्टीत भाजणे, त्यात तेल घालून त्याची वात पेटविणे, ( प्राण )वायूमुळे उजळणे, अवकाशात त्याचा प्रकाश पसरणे यामुळे पणती किंवा मातीचा दिवा म्हणजे पंचमहाभूतांचे खरे प्रतीक ठरते ! सर्वांना परवडणारे हे मातीचे दिवे ओळीने मांडणे, उजळणे म्हणजे खरी शब्दशः दिपावली ! हजारो वर्षे सुरु असलेली ही परंपरा आता विदेशातही दणक्यात साजरी होऊ लागली आहे. १० डाऊनिंग स्ट्रीट, व्हाईट हाऊस, स्वामी नारायण तसेच हरे राम हरे कृष्ण मंदिरे, अशा महत्वाच्या ठिकाणी दिवे उजळले जातात. भारतात सर्व मंदिरे, छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले, नद्यांचे घाट दिव्यांनी उजळतात. गतवर्षी अयोध्येत दिवाळीला एकूण २२,२३,६७६ तेलाचे दिवे लावून केलेला विक्रम हा विश्वविक्रम म्हणून गिनीज बुकमध्ये नोंदला गेला.


पण लहान जागेत असंख्य दिव्यांची रांग,ओळ मांडता येत नाही. म्हणून नंतरच्या काळात धातूच्या दिपांच्या छोट्या छोट्या आवली म्हणजे ओळी तयार केल्या जाऊ लागल्या. दारावर, देवळात गाभाऱ्या भोवती धातूच्या दिव्यांची तोरणे, कमानी उभारल्या जाऊ लागल्या. माझ्या संग्रहातील अशाच काही दीपावली आणि तोरणांचे फोटो सोबत देत आहे. यातील पहिल्या फोटोत ५ कमळांची दिपावली ( दीपमाला ) असून दुसऱ्या फोटोत देवळांमध्ये लावली जाणारी दिपावली आहे. नंतरच्या २ फोटोंमध्ये दरवाजाच्या गणेशपट्टीखाली लावण्याचे ५ दिव्यांचे पितळी साखळीचे आणि ८ अधिक ४ / ४ दिव्यांचे तोरण आहे. यातून गरम तेल कुणाच्या अंगावर सांडू नये म्हणून पुरेशी काळजीही घेण्यात आलेली आहे. पाचव्या फोटोतील दिव्यांच्या कमानीला दक्षिण भारतात " वासल मालाई विलाक्कु " असे म्हटले जाते. तेथे देवाच्या मूर्तीभोवती किंवा देव्हाऱ्याच्या दाराभोवती अशा अगदी ६ ते ८ फुटांच्या कमानी पाहायला मिळतात. शेवटच्या फोटोत छोट्या झाडांच्या ओळीबरोबरच दिव्यांची ओळही पहायला मिळते. हे सर्व दिवे खूप जुने आहेत. यातील वासल मालाई विलाक्कु मात्र दक्षिण भारतातील दुकानांमध्ये अजूनही विक्रीसाठी उपलब्ध असतात.

अशी ही दीपावली तुम्हा सर्वांना खूप सुखसमृद्धीची, आनंदाची आणि भरभराटीची जावो !

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले.

१९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी



सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली.

१९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## पत्र मानस

### किल्ले बांधण्याची प्रथा जपायला हवी !

गडकोट किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या सवंगडी मावळयांच्या पराक्रमांच्या आणि त्यागाच्या खुणा असलेले हे किल्लेच आपले खरे वैभव आहे. प्रत्येक गड किल्यांच्या स्वतंत्र इतिहास असून या प्रत्येक गड किल्ल्याने जसा येथील भूमिपुत्रांचा पराक्रम आणि वैभव अनुभवले आहे, तशा परकीयांकडून दिल्या गेलेल्या हाल अपेष्टाही भोगल्या आहेत. छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची आठवण म्हणून गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या काळात किल्ले बांधण्याची प्रथा राज्यात सुरु झाली. दिवाळीचा आणि किल्ले बांधण्याच्या प्रथेचा तसा काही संबंध नसला तरी त्यानिमित्ताने बालमनावर पराक्रमाचे, स्वाभिमानाचे आणि त्यागाचे संस्कार निर्माण होण्यास मदत होते. उभारलेल्या किल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीसह अष्टप्रधान मंडळ आणि मावळे यांच्या प्रतिकृती ठेवल्या जातात ज्या शिवरायांच्या आदर्श राज्यकारभाराची जाणीव करून देतात. त्यामुळे या प्रथेचे जतन करणे आवश्यक आहे; आजमितीला किल्ले बनवण्याची प्रथा राज्यातील काही भागांमध्येच जिवंत असलेली पाहायला मिळते. हल्लीची पिढी ही मैदानी खेळांपेक्षा मोबाईल, टी.व्ही. आणि व्हिडीओ गेम्सच्या दुनियेत हरवणारी आहे. तिला यातून बाहेर काढायचे असेल, तर तिला अशा काही प्रथांची माहिती करून द्यायला हवी. जेणेकरून मुलांच्या कलागुणांना वाव तर मिळेलच शिवाय त्यांच्यामध्ये आपल्या इतिहासाविषयी प्रेम निर्माण होऊन पराक्रमाचे आणि नीतिमत्तेचे संस्कार होण्यास मदत होणार आहे.

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

### उमेदवार निवडुन आल्यावर त्याच्या संपत्तीत दुप्पट तिप्पट वाढ कशी काय होते ?

"याचसाठी करतात का हट्टाहास ? " असा प्रश्न मत देणाऱ्या मतदाराला पडत आहे. लोकांनी , लोकांची, लोकासाठी असलेली भारतीय लोकशाहीचा दुरूपयोग संधीसाधु, भ्रष्ट, गुंड, लुटारू उमेदवारांसाठी लोकांनी का म्हणुन मतदान करायचे ? देशभक्तांनी याच साठी यांच्यासाठी जीवाचे बलिदान केले. निवडणुकीला कोणत्याही पक्षाचा उमेदवार उमेदवार म्हणुन उभा राहतो अन् निवडुन येतो तेव्हा त्याची संपत्ती ५ वर्षात दुप्पट किंवा तिनपटीने किंवा त्याहुन अधिक संपत्ती वाढलेली आपल्याला पहायला मिळते. हे कशाचे द्योतक आहे ? दुसऱ्यांदा तिकीट दिले की आपल्याला पहिल्या उमेदवारीच्या वेळी असलेली संपत्ती ही दुप्पट किंवा तिप्पट झाली असल्याचे लक्षात येते. याचाच अर्थ असा होतो की ऐनकेनप्रकारेन संपत्ती वाढीचा उगम हा लोकप्रतिनिधी झाल्यानंतरच वाढलेली दिसते. कष्टाची, कमवलेली संपत्ती किती व ५-१० वर्षात कमा करून वा चुकीच्या मार्गाने किंवा भ्रष्टाचाराच्या मार्गाने मिळालेली संपत्ती टक्केवारीच्या मार्गानेच दाम दुप्पट करण्यासाठीच उमेदवारी हवी असते. भ्रष्टाचाराच्या उमेदवाराला तुरूगात टाकण्याऐवजी त्याला दुसऱ्यांदा पक्षाकडुन तिकीट दिले जाते. तेव्हा पक्ष किती भ्रष्ट आहे हेसुद्धा दिसुन येत आहे. पार्टी फंड दिला की काळा पैसा व्हाइट होतो. लोकशाहीची अवस्था राजकारणी मंडळींनी भ्रष्ट केली आहे. प्रत्येक विभागातील नागरिकांनी पक्षाने दिलेला उमेदवार किती योग्य की अयोग्य याचा सद् सद् विवेक बुद्धीने विचार करावा. लाच दिली म्हणुन भ्रष्ट उमेदवाराला मतदान करू नये. नाहीतर ५ वर्षे आपल्याला पश्चाताप करावा लागेल. किती तरी प्रश्न देशात, राज्यासमोर आहेत. याचा थोडा तरी विचार करावा. प्रामाणिक उमेदवार आपण निवडुन देणार आहोत की नाही ? उमेदवार निष्कलंक, प्रामाणिक, उमेदवारालाच मत द्या. लोकशाहीची दुर्दशा आपण चुकीच्या उमेदवाराला मतदान केल्याने वाढली जात आहे. हे दुर्दैव्य भारतीयांचेच म्हणायला हवे का ? की नशीबालाच दोष देत कपाळाला हात मारून बसणार ? जागे व्हा. संविधानाने दिलेली संधी मतदारांनी वाया घालवु नये.

**- अनंत द. दाभोळकर. अंधेरी**

### कोठे आहे महागाई?

या वर्षी सोन्या-चांदीच्या दरात सर्वाधिक वाढ झाली असून सोने ८१,००० व चांदी एक लाख रुपयांवर पोहचले आहे. सोन्यावरील आयात शुल्क १५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर घटल्याने सणासुदीच्या खरेदीत वाढ निश्चितच दिसत आहे. धनत्रयोदशी हा सोनेखरेदीचा मुहूर्त साधत मुंबईत तब्बल एक हजार किलो सोन्याची खरेदी विक्री झाली.बाजारात रुपये पंधराशे कोटी व चांदीची रुपये ८५० कोटीची उलाढाल झाली.ही दिवाळी संपेपर्यत वाढणार आहे. देशातील जनता महागाईने त्रस्त आहे. महागाई महागाई असे म्हणता कोठे आहे महागाई? एका दिवसात २३०० कोटीची उलाढाल होते. देशातील श्रीमंतांना महागाईची झळ बसत नाही. पण गरीबांना महागाई नकोशी झाली आहे.श्रीमंत व गरीब अशी दरी वाढत आहे. आपल्या देशात श्रीमंत अजून श्रीमंत होत आहे गरीब अजून गरीब होत आहेत. सणासुदीच्या काळात वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य जनता अक्षरश: हैराण झाली आहे. आवाक्याबाहेरील महागाईची किमंत यापूर्वी राजकीय पक्षांना आपली सरकारे गमावली आहेत.आताच्या सत्ताधा-यांना महागाई आटोक्यात आणण्यात अपयश आले आहे. निवडणुकीनंतर आणखी महागाई वाढणार आहे. महागाई करून गरीबांना जगू द्यावे.

**- विवेक तवटे , कळवा, ठाणे**

## डोंबिवलीतील दोघांना पिस्तुलसह अटक

**डोंबिवली :** विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना येथील बाजारपेठ पोलिसांनी डोंबिवलीतील दोन जणांना कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात सोमवारी सापळा लावून अटक केली. त्यांच्याकडून पिस्तुल, जिवंत काडतुस जप्त करण्यात आली आहेत. विनय हरीहरन अय्यर (२७) असे एका इसमाचे नाव आहे. ते ओला उबर मोटारीचे चालक म्हणून व्यवसाय करतात. डोंबिवली पूर्वेतील राजाजी पथ भागात ते राहतात. गणेश विनोद तिवारी (२६) असे दुसऱ्या इसमाचे नाव आहे. ते डोंबिवली जवळील खोणी गाव परिसरातील म्हाडा गृहसंकुलात राहतात. तेही चालक म्हणून व्यवसाय करतात. बाजारपेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेशसिंग गौड यांना गुप्त माहिती मिळाली की कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात फोर्टिस रुग्णालय रस्त्यावर दोन इसम एका रिक्षेमधून पिस्तुल आणि सोबत जिवंत काडतुस घेऊन फिरत आहेत. पोलीस निरीक्षक डुकळे, गुन्हे शोध पथकाचे साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे यांच्या पथकाने तातडीने कृषी उत्पन्न बाजार समिती भागात सापळा लावला. फोर्टिस रुग्णालय भागातील रस्त्यावर पोलिसांनी रिक्षेतील दोन जणांना अडविले.




**म ह त्वा चे**

### सायन्स ऑफ हिलिंग शिबिर

**ठाणे :** शक्तीशाली मंत्रसाधनेद्वारे मधुमेह, हृदयविकार, फ्रोजन शोल्डर, मणक्यांचे विकार इ. जुनाट आजारांवर तात्काळ सकारात्मक बदल घडवून आणणारे तसेच प्रत्येकातील रोगनिवारण शक्ती जागृत करणारे, 'अंतर योग' या फोर्ट, मुंबई स्थित आध्यात्मिक संस्थेचे संस्थापक सद्गुरू आचार्य उपेंद्रजी यांचे 'सायन्स ऑफ हिलिंग' हे दोन दिवसांचे अभूतपूर्व शिबिर येत्या ९ व १० नोव्हेंबर रोजी ठाण्यात प्रथमच, सीकेपी हॉल येथे आयोजित करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी 9870741443 यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांसाठी मतदान जागरुकता शपथविधी

**पनवेल :** आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका-२०२४ च्या अनुषंगाने मतदान जागरुकता निर्माण करण्यासाठी शनिवार 26 ऑक्टोबर रोजी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ ए.एस. सी. पनवेल यांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता निर्माण करणे आणि जास्तीत जास्त मतदानासाठी प्रेरित करणे होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकत आपल्या सभोवतालच्या नागरिकांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. "युवा मतदारांचा सहभाग लोकशाहीला बळ देतो," असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना कुमारी साक्षी भागवत हिने मतदानाची शपथ दिली, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात जबाबदारीची भावना निर्माण झाली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अधिकारी प्रा. चंद्रकांत मुकादम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आभार व्यक्त केले.
हा शपथविधी कार्यक्रम मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांच्या सहभागाने यशस्वी झाला, ज्यात प्राध्यापक आणि विद्यार्थी दोघेही उत्साहाने सहभागी झाले होते.

### मतदानावर बहिष्काराचा इशारा

**पनवेल :** आदई येथील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने हिल व्ह्यू कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था आदई यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. नेरे , आदई परिसरात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे रहिवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आदई परिसरात वारंवार वेगवेगळ्या कारणास्तव वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे लहान मुले आणि जेष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. सततच्या विद्युत पुरवठा खंडित होण्यामुळे उपकरणे देखील खराब होतात. खंडित होणाऱ्या वीज पुरवठा बाबत नेरे शाखेच्या अधिकाऱ्यांना एका वर्षापासून भेटून आणि लेखी निवेदन देऊन देखील उपाययोजना आणि कार्यवाही झालेली नसल्याचे हिल व्ह्यू कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्थेचे म्हणणे आहे.

# कॅनडात कारच्या अपघातात चौघांचा मृत्यू

## 'डीएनए'वरुन नाशिकच्या तरुणाची पटली ओळख, कॅनडा सरकारने नाकारला कुटुंबाचा व्हिसा

**प्रतिनिधी**
■ **नाशिक**

कॅनडाच्या टोरंटो शहरामध्ये 24 ऑक्टोबरला रात्रीच्या सुमारास नवीन टेस्ला कारचा अपघातात स्फोट होऊन चार तरुणांचा मृत्यू झाला. या अपघातात नाशिकच्या इंदिरानगरमधील दिग्विजय राजेंद्र औसरकर (वय 30) या तरुणाचा मृत्यू झाल्यानं मोठी हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दिग्विजयचे वडील आणि बहीण नाशिकहुन कॅनडाला गेल्यानंतर डीएनएद्वारे दिग्विजयची ओळख पटवण्यात कॅनडा पोलिसांना यश आलं आहे. दिग्विजय हा मेकॅनिकल इंजिनिअर म्हणून एका मोठ्या कंपनीमध्ये उच्चपदावर कार्यरत होता.



नाशिकच्या दिग्विजय राजेंद्र औसरकर यानं अमेरिकेतून मेकॅनिकल इंजिनियरचं शिक्षण पूर्ण केलं. दिग्विजय हा अतिशय हुशार असल्यानं त्याला तेथील विद्यापीठानं ब्रँड अँबेसिडर केलं. दोन वर्षापूर्वीच त्याला कॅनडा इथं एका मोठ्या कंपनीत उच्चपदावर नोकरी मिळाली. त्यामुळे नोकरीनिमित्त तो कॅनडाला स्थायिक होता. पंधरा दिवसापूर्वीच त्याची आई-वडील हे त्याला भेटून भारतात नाशिक इथं परतले. मात्र 24 ऑक्टोबरला झलक पटेल या त्याच्या मैत्रिणीचा वाढदिवस असल्यानं गुजरातचे केता गोहली, निल गोहली हे भाऊ बहिणीसह चौघंजण वाढदिवस साजरा करण्यासाठी रात्री टोरंटो शहरात एकत्र जमले. त्यांच्या एका मित्रानं नवीनच टेस्ला कार खरेदी केल्यामुळे वाढदिवस सेलिब्रेशन झाल्यानंतर हे चौघंजण टेस्ट ड्राईव्हला बाहेर पडले. यावेळी अचानकपणे एका गतिरोधकावरुन कार उलटली आणि रस्त्यालगत असलेल्या लोखंडी गल्डरवर जाऊन आदळली. याच क्षणी कारनं पेट घेत काही मिनिटातच मोठा स्फोट झाला. या अपघातात दुर्दैवानं बर्थडे गर्ल झलकचे प्राण वाचले. मात्र चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दिग्विजय हा आई-वडिलांना एकुलता एक मुलगा होता. या दुर्घटनेमुळे औसरकर कुटुंबाला दिवाळीत मोठा आघात झाला आहे. या दुःखाच्या प्रसंगी कॅनडा सरकारकडून नातेवाईकांना व्हिसा नाकारला गेला. सुदैवानं केवळ त्याचे वडील राजेंद्र औसरकर आणि बहीण स्वामिनी औसरकर यांचा व्हिसा हा संपला नव्हता. त्यामुळे त्यांना कॅनडाला जाता आलं.

# बंडखोराच्या मनधरणीसाठी भाजपकडून 'चार्टर्ड प्लेन'

**प्रतिनिधी**
■ **शिर्डी**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपलेली आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीतील घटकपक्षांपुढं नाराज नेत्यांनी केलेल्या बंडखोरीचं मोठं आव्हान उभं राहिलं आहे. उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत 4 नोव्हेंबरपर्यंत आहे. सर्वच राजकीय पक्षांकडून बंडखोरांना शांत करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मविआ आणि महायुतीच्या नेत्यांचं बैठकांचं सत्र सुरु आहे. भाजपनं मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मतदारसंघात बंडखोरी करणाऱ्या राजेंद्र पिपाडा आणि त्यांच्या पत्नीची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत.



शिर्डी विधानसभा मतदारसंघात भाजपच्या राजेंद्र पिपाडा यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पिपाडा यांनी बैलगाडीतून जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आता राजेंद्र पिपाडा यांची समजूत काढण्यासाठी भाजप श्रेष्ठींनी खास विमान पाठवलं आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघातील बंडखोरी रोखण्यासाठी भाजप कडून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. भाजपचे राजेंद्र पिपाडा आणि त्यांच्या पत्नीने बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केला आहे. आता भाजपकडून राजेंद्र पिपाडा यांची बंडखोरी शमवण्यासाठी भाजपकडून प्रयत्न केले जात आहेत. राजेंद्र पिपाडा यांना मुंबईत बोलावण्यात आलं आहे. राजेंद्र पिपाडा आणि त्यांच्या पत्नीला घेण्यासाठी भाजपकडून खास शिर्डीत स्पेशल चार्टड फ्लाईट पाठवण्यात आलं आहे. राजेंद्र पिपाडा विशेष विमानानं मुंबईकडे रवाना झाले आहेत.

## ठाण्यातील सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित



**प्रतिनिधी**
■ **डोंबिवली**

ठाणे आयुक्तायल क्षेत्रातील सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी ठाणे पोलिसांचे सायबर पोलीस ठाणे अखेर कार्यान्वित झाले आहे. नव्या पोलीस ठाण्यामुळे आता सायबर गुन्ह्यासंदर्भात तपासाला वेग येण्याची शक्यता आहे. या पोलीस ठाण्यात सहा अधिकारी आणि ३० कर्मचारी असणार आहेत. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयाजवळ हे पोलीस ठाणे बांधण्यात आले आहे.

गेल्याकाही वर्षांमध्ये ठाणे जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात नागरिकरण वाढले आहे. त्याप्रमाणे गुन्ह्यांची प्रकरणे देखील वाढली आहेत. ठाण्यात दररोज सायबर गुन्हे घडत आहेत. शेअर मार्केटच्या नावाने फसवणूक, मोबाईलवर एखादी लिंक पाठवून बँक खाते रिकामे करणे, ऑनलाईन ‘टास्क’ देऊन आर्थिक फसवणूक करणे अशा प्रकरणांमध्ये फसवणुकीचे प्रमाण अधिक आहे.

## गुन्हा लपविल्याच्या आरोपामुळे भाजपचे संजय केळकर अडचणीत

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

ठाणे शहर विधानसभा मतदार संघातील भाजपचे आमदार संजय केळकर यांनी करोना काळात केलेल्या आंदोलनासंबंधीच्या गुन्ह्याची माहिती लपविल्याचा आरोप करत त्यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यासंबंधी शिवसेना (ठाकरे गट) उमेदवार राजन विचारे यांनी केलेली मागणी निवडणुक अधिकाऱ्यांनी फेटाळून लावली. यामुळे केळकर यांचा उमेदवारी अर्ज कायम झाला असला तरी या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा विचारे यांनी दिल्याने केळकर अडचणीत येण्याची चिन्हे आहेत.



ठाणे शहर विधानसभा मतदार संघातून भाजपने आमदार संजय केळकर यांना तिसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे. शिवसेना (ठाकरे गट) तर्फे राजन विचारे यांना तर, मनसेने अविनाश जाधव यांना उमेदवारी दिली आहे. या सर्वांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यांच्यासह अपक्ष उमेदवारांनीही अर्ज दाखल केले आहेत. मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख होती.

### निवडणुक अधिकाऱ्यांनी हरकत फेटाळली

यानंतर बुधवारी सकाळी उमेदवारी अर्ज छाननी प्रक्रीया पार पडली. यावेळी भाजपचे उमेदवार संजय केळकर यांच्या उमेदवारी अर्जावरच शिवसेना (ठाकरे गट) उमेदवार राजन विचारे यांनी हरकत घेतली. करोना काळात संजय केळकर यांनी आंदोलन केले होते. या संदर्भात केळकर यांच्यावर नौपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. परंतु त्या गुन्ह्याची माहिती केळकर यांनी उमेदवारी अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रात दिली नसून या गुन्ह्याची माहिती लपविल्यामुळे त्यांचा उमेदवारी अर्ज बाद व्हावा अशी मागणी राजन विचारे यांनी निवडणुक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्याकडे केली.

## डोंबिवलीतील फडके रोडवर ढोलताशाला बंदी, डिजेला परवानगी

**प्रतिनिधी**
■ **डोंबिवली**

दिवाळी सणानिमित्त गुरुवार, शुक्रवार डोंबिवली पूर्वेतील फडके रस्त्यावर तरुणाईचा जल्लोष असतो. फडके रस्ता तरुणाईने गजबजून गेलेला असतो. या कालावधीत चेंगराचेंगरी किंवा अन्य कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी, तसेच विधानसभा निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी फडके रस्ता भागात ढोलताशा वादनास पोलिसांनी बंदी घातली आहे. असं असतांना डीजे लावून कार्यक्रमाला परवनागी देण्यात आल्यानं आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. ध्वनी मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्या एका कार्यक्रमाला वेगळा न्याय आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतीक असलेल्या ढोलताशाला बंदी असं चित्र निर्माण झालं आहे. त्यामुळे फडके रस्त्यावर वर्षानुवर्ष होणारे डीजे लावणे आणि त्या गाण्यांवरील नृत्याचे कार्यक्रम पार पडणार आहेत. आचारसंहितेमुळे पक्षीय नेते या कार्यक्रमात किती सहभागी होतात याविषयी अनेकांनी अनभिज्ञता दर्शवली. श्री गणेश मंदिर संस्थानने दिवाळी पहाट कार्यक्रम शांतते पार पडेल या दृष्टीने नियोजन केले आहे.

“दिवाळी पहाट कार्यक्रमानिमित्त काही संस्था फडके रस्त्यावर डीजे लावून कार्यक्रम सादर करतात. या संस्थांनी ध्वनी मर्यादाचे पालन करून डीजे लावायचे आहेत. ध्वनी मर्यादेचे पालन, इतर कोणालाही कर्णकर्कश आवाजाचा त्रास होणार नाही याची काळजी आयोजकांनी घ्यायची आहे.

# मनमाड-नांदगाव मार्गावर भीषण अपघात

## दोन चिमुकल्यांसह तीनजण ठार

**प्रतिनिधी**
■ **मनमाड**

टँकरच्या भीषण धडकेत दोन चिमुकल्यांसह तीन जणांचा मृत्यू झाल्यानं मोठी खळबळ उडाली. ही घटना मनमाड नांदगाव महामार्गावर पानेवाडीजवळ घडली. अपघातानंतर जखमींना मनमाडच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं. अपघातातील मृत जळगाव जिल्ह्यातील पारोळा इथले असल्याची प्राथमिक माहिती सूत्रांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, की मनमाड नांदगाव महामार्गावर दोन दुचाकीला टँकर क्रमांक एमएच 16 सीसी 5524 नं धडक दिली. या अपघातात दोन लहान मुलांसह तीन जणांचा मृत्यू झाला, तर एक लहान मुलगा आणि दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना मनमाड इथल्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर गंभीर जखमींना मालेगाव इथं अधिक उपचारासाठी दाखल करण्यात आलं. अपघाताची भीषणता इतकी होती, की दोन्ही दुचाकीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि मनमाड शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं. पुढील तपास पोलीस करत आहेत.

मनमाड नांदगाव महामार्ग बनला मृत्यूचा सापळा : मनमाड ते नांदगाव हा महामार्ग चौपदरी करण्यात आला आहे. मात्र या महामार्गावर इंधन कंपनीचे टँकर सुसाट वेगानं जातात. या टँकर चालकांच्या हलगर्जीमुळे अनेकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. या अपघातातील टँकर चालक दारू प्यायला होता, असा आरोप नागरिकांनी केला. त्यानं मागून दोन्ही दुचाकीला धडक दिली यात तिघांचा मृत्यू झाला. या प्रकारचे अपघात कायम या महामार्गावर होत असल्यानं हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे.

# उल्हासनगर मतदारसंघातील 36 अर्जपैकी 29 अर्ज वैध आणि 7 अर्ज अवैध

**प्रतिनिधी**
■ **उल्हासनगर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार संघातील उमेदवारांनी भरलेल्या नामनिर्देशन अर्जाची दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ रोजी नवीन प्रशासकीय इमारत, पवई चौक, उल्हासनगर येथे निवडणूक निर्णय अधिकारी, १४१- विधानसभा मतदारसंघ,उल्हासनगर यांनी एकुण




३६ नामनिर्देशन पत्रांची छाननी केली. सदर छाननीत एकुण ३६ अर्जापैकी २९ अर्ज वैध आणि ७ अर्ज अवैध ठरविण्यात आले.

सदर छाननीस मा. निवडणूक निरिक्षक आर थी एम. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, विजयानंद शर्मा व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्रीम. कल्याणी कदम तसेच संबधीत उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## गजानन मार्केटमधील कपड्यांच्या दुकानाला भीषण आग

**प्रतिनिधी**
■ **उल्हासनगर**

उल्हासनगरच्या गजानन मार्केट परिसरात कपड्याच्या दुकानाला भीषण आग लागली आहे. उल्हासनगर आणि कल्याण अग्निशमन दलाकडून आग विझवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेत दुकानातील लाखो रुपयांचा माल जळून खाक झाला आहे. जवळच फटाका मार्केटही असल्यानं व्यापारी तसेच



नागरिकांमध्ये भीती पसरली आहे.

उल्हासनगरमधील गजानन मार्केट फार मोठं आहे. येथे कल्याण, विठ्ठलवाडी, अंबरनाथ तसेच बदलापूर, वांगणी आणि कर्जतपर्यंतच्या व्यक्ती खरेदीसाठी येतात. या भव्य बाजारात विविध कपड्यांची दुकाने आहेत. संपूर्ण बाजारपेठेत कपड्यांचीच जास्त दुकाने आहेक. त्यासह रस्त्यावर विविध शोभेच्या वस्तू, दिवाळीचे कंदिल, महिलांसाठी सौंदर्यप्रसादने सर्व काही उपलब्ध आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती मोठी खरेदी करायची असल्यास येथे येतात.

## पालिकेकडून आशा सेविकांना सहा हजार रुपयांची 'दिवाळी भेट'

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग २ ते ४ च्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानासह ऑक्टोंबर महिन्याचे वेतन पालिकेने दिवाळी पुर्वीच दिले असून त्याचबरोबर शहरातील आशा सेविकांनाही पालिकेने सहा हजार रुपयांची दिवाळी भेट दिली आहे. त्यामुळे पालिका कर्मचाऱ्यांबरोबरच आशा सेविकांची दिवाळी गोड झाली आहे.




दिवाळी सणाच्या निमित्ताने ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येते. यंदा २४ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका प्रशासनाला दिले होते. या आदेशानंतर दिवाळीपुर्वीच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्याचे काम पालिकेने सुरू केले होते. यामध्ये वर्ग एक च्या अधिकाऱ्यांनी सानुग्रह अनुदान घ्यायचे नाही असा निर्णय घेतला असून यामुळे वर्ग २ ते वर्ग ४ च्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात पालिकेने सानुग्रह अनुदानाच्या रक्कमेसह ऑक्टोबर महिन्याचे वेतन जमा केले आहे. तसेच, आशा सेविकांना देण्यात येणारी सहा हजार रुपयांची दिवाळी भेट दिवाळीपूर्वीच बॅंक खात्यात जमा करण्यात आली आहे. त्यामुळे आशा सेविका आणि कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी साजरी केली दिवाळी

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

सर्व प्रकारच्या दिव्यांगांना सक्षम करणारे केंद्र म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेचे ईटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र संपूर्ण देशभरात नावाजले जात असून महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी ईटीसी केंद्राला दिवाळी सणानिमित्त भेट देत दिव्यांग विद्यार्थी व व्यक्तींसमवेत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांच्या चेह-यावर दिसणारा आनंद अत्यंत समाधान देणारा असल्याचे आयुक्तांनी सांगितले. याप्रसंगी त्यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, ईटीसी केंद्र संचालक तथा उपआयुक्तसंघरत्ना खिल्लारे, वाशी विभागाचे सहा. आयुक्त सागर मोरे व केंद्राच्या प्रमुख व विशेष शिक्षक आणि पालक मोठया संख्येने उपस्थित होते.



यावेळी आयुक्तांनी व उपस्थित मान्यवरांनी दिव्यांग विद्यार्थी व व्यक्तींना फराळ देत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी व पालकांशी सुसंवाद साधतांना आयुक्तांनी दिव्यांगांना मदतीचा हात देत सक्षम करण्याची जबाबदारी ही प्रशासन, विशेष शिक्षक व पालक अशी सर्वांचीच असल्याचे सांगत एकत्र येउन अधिक चांगले कल्याणकारी काम जबाबदारीने करुया असे सांगितले. दिव्यांग मुलांचे पालक हे देखील विशेष शिक्षक असल्याचे नमूंद करीत आयुक्तांनी ईटीसी केंद्रात मुलांसमवेत येणा-या पालकांसाठीही विशेष उपक्रम राबवावेत असे निर्देर्शित केले. तंत्रज्ञानात झपाटयाने बदल होत असून दिव्यांगांसाठीच्या अद्ययावत उपचार पध्दतींचा समावेश ईटीसी केंद्रात करावा असेही आयुक्तांनी सूचित केले.

ईटीसी केंद्रातील विविध शैक्षणिक कक्षांना व वर्गांना भेट देत आयुक्तांनी तेथील विशेष शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद साधला. यावेळी आयुक्तांनी दिव्यांग मुलांच्या कौशल्य विकासावर लहानपणापासूनच भर देण्याची सूचना करीत त्यादृष्टीने नियमित शिक्षणासोबतच विविध प्रकारचे व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्याचीही सुविधा उपलब्ध् करुन देण्याची कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

यावेळी उपस्थित पालकांपैकी 10 पालकांनी आपले मनोगत व्यक्त करताना ईटीसी केंद्रामुळे त्यांच्या पाल्यांच्या जीवनात घडलेल्या आमुलाग्र बदलाबद्दल गौरवोद्गार काढले. अनेक पालकांना बोलताना आनंदाश्रू अनावर झाले. ईटीसी केंद्रातील वेगवेगळया उपचार पध्दतींचा मुलांच्या वर्तनावर होणारा सकारतमक परिणाम पालकांनी अत्मियतेने सांगितला.

# कल्याण ग्रामीण मतदारसंघात छाननीअंती सर्व (14) उमेदवार वैध

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत मंगळवार दि. 29 ऑक्टोबर 2024 रोजी दुपारी 03.00 वाजता संपली. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या मुदती अखेर 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात एकूण 14 उमेदवारांनी 18 नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते.

या सर्व नामनिर्देशन अर्जाची छाननी 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी आज बुधवार, दि. 30 ऑक्टोबर 2024 रोजी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधीं समोर केली. यावेळी 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे केंद्रीय सर्वसाधारण निरीक्षक पुरुषोत्तम कुमार (भाप्रसे) उपस्थित होते.

*अ) 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात वैध ठरलेले उमेदवार :- 14*
*1) दीपक दत्ता खंदारे - बहुजन समाज पार्टी.*
*2) प्रमोद रतन पाटील - महाराष्ट्र नवनिर्माण सेना.*
*3) सुभाष गणु भोईर - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे).*
*4) राजेश गोवर्धन मोरे - शिवसेना.*
*5) उज्वला गौतम जगताप - भारतीय जन विकास आघाडी.*
*6) विकास प्रकाश इंगळे - वंचित बहुजन आघाडी.*
*7) हबीबुर्रहमान ओबेदुर्रहमान खान - पीस पार्टी.*
*8) शिवा कृष्णमूर्ती अय्यर - अपक्ष.*
*9) नरसिंग दत्तु गायसमुद्रे - अपक्ष.*
*10) प्रियांका गजानन मयेकर - अपक्ष.*
*11) दिपक रामकिसन भालेराव - अपक्ष.*
*12) परेश प्रकाश बडवे - अपक्ष.*
*13) चंद्रकांत रंभाजी मोटे - अपक्ष.*
*14) अश्विनी अशोक गंगावणे - अपक्ष.*
*ब) 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात अवैध ठरलेले उमेदवार :- निरंक.*
*नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांना दि. 04 नोव्हेंबर 2024 रोजी दु.3.00 वाजेपर्यंत आपला उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे.*

# वडिलांना कोणी त्रास दिला याचे उत्तर योग्य वेळी देऊ

## रोहित पाटलांकडून अजितदादांवर अप्रत्यक्ष आरोप

प्रतिनिधी

■ पुणे

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिवंगत माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्यावर अतिशय गंभीर आरोप केले आहेत. आर. आर. आबांनी आपल्या विरोधातील सिंचन घोटाळयाच्या फाईलवर अजित पवारांची खुली चौकशी व्हावी यासाठी सही केली, असा आरोप अजित पवारांनी काल केला. त्यानंतर आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील यांनी अप्रत्यक्षपणे अजित पवारांवर गंभीर आरोप केले. उपमुख्यमंत्री, गृहमंत्री असताना माझ्या वडिलांना कोणी त्रास दिला याचे उत्तर योग्य वेळी देऊ, असं म्हणत रोहित पाटील यांनी अप्रत्यक्षपणे अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. "गृहमंत्री, उपमुख्यमंत्री असताना माझ्या वडिलांना कोणी त्रास दिला हे मला माहीत आहे. योग्यवेळी त्याचं योग्य उत्तर देऊ", असं रोहित पाटील म्हणाले.



वडील हयात असताना त्यांना मानसिक त्रास काय काय झाला, हे आबा त्यांच्या पुण्यातील मित्रांच्या खांद्यावर डोके ठेवून रडायचे. हे मला आबांच्या मित्रांनी सांगितलं आहे. आबांना कोण त्रास द्यायचं याचं उत्तर आपण योग्य वेळी देऊ, असं रोहित पाटील यांनी स्पष्ट केलं. ते तासगावच्या ढवळी येथे प्रचार शुभारंभाच्या सभेमध्ये बोलत होते. अजित पवारांनी तासगावमधून आर. आर. आबांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावरून रोहित पाटलांनी हा निशाणा साधला.

अजित पवार यांची मंगळवारी (29 ऑक्टोबर) सांगलीच्या तासगाव येथे सभा पार पडली होती. या सभेत त्यांनी आर. आर. पाटील यांच्याबद्दल जे वक्तव्य केलं त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. आपण आर. आर. आबांना प्रत्येक वेळेला मदत केली. पण आर. आर. आबांनी आपल्याविरोधात उघड चौकशी करावी या फाईलवर स्वाक्षरी केली, असा आरोप अजित पवारांनी केला. "मला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. म्हणाले, याच्यावर 70 हजार कोटींचा आरोप करुयात. अजितराव घोरपडे त्या खात्याचे मंत्री होते. माझ्यावर ज्यादिवशी आरोप झाला तेव्हापासून महाराष्ट्राची 1 मे 1960 ला निर्मिती होऊन ते आरोपाच्या दिवसापर्यंत पगाराचा आणि सगळा खर्च 42 हजार कोटींचा झाला आणि मला 70 हजार कोटींचा भ्रष्टाचार केला म्हणाला", असं अजित पवार म्हणाले.

"खर्च 42 हजार कोटी आणि भ्रष्टाचार 70 हजार कोटींचा? नाही म्हणे आकडा जितका मोठा तेवढं लोकांना वाटत असेल बरका, झालं माझी वाटच लागली. त्यातून एक फाईल निर्माण झाली. ती फाईल गृह खात्याला जाते. त्याने त्या फाईलीवर अजित पवारांची उघड चौकशी करावी म्हणून सही केली. केसाने गळा कापायचे धंदे आहेत", अशी टीका अजित पवारांनी केली.




■ कुडाळ

विधानसभा निवडणुकीत एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रकार सुरूच असतात. दरम्यान कुडाळ- मालवण मतदारसंघातील अपक्ष उमेदवार वैभव जयराम नाईक यांच्या अर्जावर घेतलेल्या हरकतीनंतर कुडाळ तहसील कार्यालय येथे दोन गटामध्ये शाब्दिक बाचाबाची झाल्याचा प्रकार घडला.

## अर्जावर हरकत घेतल्याने ठाकरे सेना - महायुतीचे कार्यकर्ते भिडले

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ- मालवण विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीमध्ये अपक्ष वैभव जयराम नाईक यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. प्रांत कार्यालय येथे अर्जाची छाननी होती. या छाननीमध्ये अपक्ष उमेदवार वैभव जयराम नाईक यांच्या अर्जावरील सूचकापैकी जयराम प्रदीप नाईक यांची या अर्जावरील सही त्यांनी केली नाही. अशी हरकत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार वैभव नाईक यांच्या प्रतिनिधींनी घेतली. या हरकतीमुळे निवडणूक निर्णय अधिकारी ऐश्वर्या काळुसे यांनी याबाबत सही करणारे जयराम नाईक यांना प्रतिज्ञापत्र देण्यासंदर्भात सूचना केल्या होत्या. त्यानुसार जयराम नाईक हे आपले प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी तहसिल कार्यालय येथे गेले असता त्यांना अडवण्याचा प्रयत्न झाला.




## कोणत्या मतदारसंघात कोणता उमेदवार पाडव्याला होणार स्पष्ट

प्रतिनिधी


■ जालना

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची 31 ऑक्टोबर रोजी दलित, मुस्लिम, मराठा समीकरणाबाबत बैठक होणार आहे. समीकरणाशिवाय पर्याय नाही. ही बैठक अधिकृत असेल. या बैठकीत काय निर्णय होईल, हे उद्याच कळेल. दिवाळीपर्यंत कुणीही आंतरवाली सराटीत येऊ नये, असे आवाहनही मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना केले आहे.

31 ऑक्टोबरची बैठक झाल्यानंतर बैठकीतील निर्णय एक दिवस उशिरा सांगणार आहे. दुसऱ्या दिवशी दिवाळी असून आनंदाचा दिवस आहे. त्यामुळे बैठकीतील निर्णय पाडव्याच्या दिवशी सांगितला जाईल. कोणत्या मतदारसंघात कोण उमेदवार देणार हे देखील त्याचदिवशी सांगणार असल्याचेही मनोज जरांगे म्हणाले. माझा पाठिंबा देण्यासाठी काही लोक पैसे



मागत असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला आहे. उद्याची बैठक झाल्यानंतर सर्व काही स्पष्ट होईल, असेही जरांगे यांनी सांगितले. दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची प्रकृती आज खालावली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंतरवाली सराटी येथे इच्छुकांची भेटीगाठी गर्दी होत आहे. 31 ऑक्टोबरला आपला निर्णय सांगणार असल्याने जरांगे यांनी म्हटले होते.









पुणे : श्री विघ्नहर देवस्थान ट्रस्ट ओझर येथे वसुबारस सोहळा संपन्न झाला यावेळी राजाराम शेठ विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, सिद्धिविनायक इंग्लिश मिडीयम स्कूल भांडुप चे संचालक रमेश खानविलकर सर यांनी विधिवत पूजा केली.




### गतिमंद मुलीचा तिसऱ्या मजल्यावरून पडून मृत्यू

■ जळगाव

राजकारणात सक्रिय असलेले वडील प्रचारासाठी जाणार होते. यामुळे गतिमंद असलेल्या मुलीला घरात राहू देत दाराला कडी लावून मार्गस्थ झाले. मात्र काही वेळाने मुलीने गॅलरीतून खाली उतरण्याचा प्रयत्न केला असता तिसऱ्या मजल्यावरून खाली पडली. यात तिचा जागीच मृत्यू झाल्याची घटना जळगाव शहरातील मुंदडा नगरात घडली. प्रेरणा रमेश गजरे असे मृत झालेल्या मुलीचे नाव आहे. दरम्यान प्रेरणा हि गतिमंद असल्याने वडील रमेश गजरे तिची काळजी घेत होते. तिला कधीच एकटी सोडत नसत.






## मुंबई विमानतळावर पुन्हा 'पॉफेक्ट' उपक्रम

**मुंबई :** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ येथे प्रवाशांना भावनिक आधार देण्यासाठी ९ प्रशिक्षित श्वानांचा समावेश असलेला 'पॉफेक्ट' उपक्रम पुन्हा सुरू करण्यात येत आहे. कोरोना काळात हा उपक्रम तात्पुरता बंद करण्यात आला होता.'पॉफेक्ट' हा उपक्रम पुन्हा सुरू करण्याची घोषणा विमानतळ प्रशासनाने त्यांच्या अधिकृत एक्स अकाउंटवरून केली. या उपक्रमाचा उद्देश प्रवाशांचा ताण दूर करणे हा आहे. या ९ प्रशिक्षित श्वानांमध्ये एक गोल्डन रिट्रायव्हर, एक माल्टीज, एक शिह त्झू, एक ल्हासा अप्सो, एक लॅब्रेडोर आणि हस्की यांचा समावेश असणार आहे. हे श्वान टर्मिनल २ येथे शुक्रवार ते रविवार दुपारी ३ ते रात्री ११ या वेळेत उपलब्ध असणार आहेत. दरम्यान, विमानप्रवास काही प्रवाशांसाठी कंटाळवाणा आणि तणावपूर्ण असू शकतो हे ओळखून हा उपक्रम सुरू केल्याचे विमानतळ प्रशासनाने सांगितले.



### 1)धाराशिव विरुद्ध पुणे ( मुले ) 2) सांगली विरुद्ध सोलापूर (मुली)

# दोन्ही गटात धाराशिव, सांगली विजेतेपदासाठी लढणार

## सुवर्ण महोत्सवी राज्य कुमार व मुली खो-खो स्पर्धा



प्रतिनिधी

■ धाराशिव

सुवर्ण महोत्सवी ५०वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत कुमार व मुली या दोन्ही गटातून यजमान धाराशिव आणि सांगली यांच्यातच विजेतेपदासाठी अंतिम लढत होईल.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलींच्या उपांत्य सामन्यात सांगलीने सोलापूरला १०-७ असे तीन गुणांनी नमविले. मध्यंतराची ५-३ ही आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. प्रतीक्षा बिराजदार हिने आपल्या धारदार आक्रमणात पाच गडी बाद करीत चार मिनिटे पळतीचा खेळ केला. सानिका चाफे हिने चार मिनिटे संरक्षण करीत तिला साथ दिली. सोलापूरच्या स्नेहा लामकाने (१.३०, १.४० मि. २ गुण) व प्राजक्ता बनसोडे (२.००, २.३०मि.) यांची खेळी अपुरी पडली.

दुसऱ्या सामन्यात धाराशिवने ठाण्यावर ११-७ असा डावाने विजय मिळविला. त्यांच्या विजयाचे शिल्पकार अष्टपैलू कामगिरी करणारे अश्विनी शिंदे (३ मि. व ३ गुण ) व प्रणाली काळे (४ मि. व २ गुण ) हे ठरले. ठाण्याच्या दीक्षा काटेकर (२ गुण )हिचे प्रयत्न अपुरे पडले.

मुलांच्या उपांत्य सामन्यातही सोलापूरला सांगलीकडून १५-१९ अशी हार पत्करावी लागली. मध्यंतराची ७-१० ही पिछाडीच सोलापूरला महागत पडली. सांगलीच्या पार्थ देवकतेने आपल्या धारदार आक्रमणात सहा गडी बाद करीत १.१० मि. पळती केली. अथर्व पाटील यानेही (१.२०, १.४० मि. व ५ गुण ) अष्टपैलू कामगिरी केली. सोलापूरकडून शुभम चव्हाण (१.२०,१.३० मि.) व अमरान शेख (१ मि. व ३गुण) यांची लढत अपुरी ठरली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात भरतसिंग वसावेच्या (१.४० मि. ३ गुण) अष्टपैलू खेळामुळे धाराशिवने पुण्यावर १३-१२ असा १ गुण व ४.५० मि. राखून विजय मिळविला. हरद्या वसावे (२, २.२० मि. व १ गुण ) याने त्याला साथ दिली. पुण्याच्या चेतन गुंडगल (१,१ मि. व ४ गुण ) याची अष्टपैलू खेळी अपुरी पडली.

# मुंबई कसोटीत पहिल्या दिवसापासून टर्न दिसणार

## तिसरा सामना 9 नोव्हेंबरपासून वानखेडेवर



प्रतिनिधी

■ मुंबई

मुंबई कसोटीत पहिल्या दिवसापासून फिरकीपटूंचे वर्चस्व पाहायला मिळणार आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील शेवटच्या सामन्यासाठी भारतीय संघाने रँक-टर्नर (पहिल्या दिवसापासून फिरकीपटूंसाठी उपयुक्त) खेळपट्टीची मागणी केली आहे. एका इंग्रजी वृत्तपत्राच्या अहवालात असा दावा करण्यात आला आहे की भारतीय संघ व्यवस्थापन प्रयत्न केलेल्या आणि चाचणी केलेल्या सूत्राचे पालन करू इच्छित आहे. भारतीय संघाने पुणे कसोटीसाठी फिरकीसाठी अनुकूल खेळपट्टीही तयार केली होती, परंतु टीम इंडियाला ११३ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. ३ सामन्यांच्या मालिकेत टीम इंडिया २ -० ने पिछाडीवर आहे.

पुण्यात रँक टर्नर नसून स्लो टर्निंग पिच बनवण्यात आली "ही रँक टर्नर पिच असेल," एका सूत्राने माध्यमांना सांगितले. संघ व्यवस्थापनाने अशी खेळपट्टी तयार करण्याची विनंती केली आहे, जी पहिल्या दिवसापासून फिरकीपटूंना मदत करू शकेल. असे दिसते की संघ प्रयत्न केलेल्या आणि चाचणी केलेल्या वानखेडेवर फलंदाजी करणे कठीण होईल वानखेडेच्या खेळपट्टीवर फलंदाजी करणे कठीण होईल. कारण लाल मातीने बनवलेल्या या खेळपट्टीवर फिरकी आणि उसळी यांचे मिश्रण पाहायला मिळणार आहे.

असामान्य उसळीमुळे फलंदाजांना त्रास होऊ शकतो.समुद्राच्या वाऱ्यामुळे हालचाल होण्यास मदत २९ ऑक्टोबरपर्यंत खेळपट्टीवर गवत नव्हते. येथे ग्राउंड स्टाफ नियमितपणे स्प्रिंकलरमधून पाणी सोडत आहे. तसेच, खेळपट्टी सुकविण्यासाठी मोकळी ठेवण्यात आली आहे. सामन्याच्या पहिल्या सत्रात पुणे कसोटीत रँक टर्नर खेळपट्टी नव्हती. ती मंद गतीने वळणारी खेळपट्टी होती. मात्र, जसजसा सामना पुढे सरकत गेला तसतशी खेळपट्टीला असामान्य उसळी मिळू लागली, ज्यामुळे भारतीय फलंदाजांना त्रास झाला.या सामन्यात भारतीय संघाचे २० पैकी १९ फलंदाज किवी फिरकीपटूंनी बाद केले, त्यापैकी १३ विकेट एकट्या मिचेल सँटनरने घेतले. भारतीय फिरकीपटूंनीही या सामन्यात १९ विकेट घेतल्या.एक फलंदाज धावबाद झाला. भारतीय फिरकीपटू वर्चस्व गाजवू शकतात वानखेडेच्या खेळपट्टीवर भारतीय फिरकीपटू वर्चस्व गाजवू शकतात. येथे रविचंद्रन अश्विनने १८.४२ च्या सरासरीने ३८ विकेट घेतल्या आहेत. त्याचवेळी रवींद्र जाडेजाने आपल्या एकमेव कसोटीत ६ विकेट घेतल्या.




**मुंबई :** आदर्श शिक्षण समितीने आर्य समाज लोअर परेल येथे आयोजित केलेल्या 63 व्या वर्धापनदिन व विद्यार्थी गुणगौरव करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे इयत्ता पहिली ते पदवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते नुसार निवड करून त्यांना शैक्षणिक मदत करून व शिष्यवृत्ती देऊन प्रविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांचा गौरव करण्यात आला. आदर्श शिक्षण समितीचे तह हयात विश्वस्त शांताराम गोवळकर अध्यक्ष सुरेश पवार , शंकर पाटणकर , उपाध्यक्ष - अनंत दाभोळकर आदी उपस्थित होते.

# आयसीसी कसोटी क्रमवारीत मोठी उलथापालथ

## विराट कोहली, ऋषभ पंत टॉप-10 मधून आऊट



वृत्तसंस्था

■ लंडन

नवीन आयसीसी कसोटी क्रमवारीत मोठे बदल पाहायला मिळत आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या गेल्या सामन्यात भारतीय संघाच्या स्टार खेळाडूंच्या खराब कामगिरीनंतर आयसीसी क्रमवारीत मोठी घसरण झाली आहे. परिस्थिती अशी झाली आहे की आता टॉप १० मध्ये फक्त टीम इंडियाचा फक्त एकच खेळाडू उरला आहे.

यावेळी आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या क्रमवारीत इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट पहिल्या क्रमांकावर आहे. त्याचे रेटिंग ९०३ झाले आहे. न्यूझीलंडचा केन विल्यमसन ८१३ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर कायम आहे. दरम्यान, चांगली गोष्ट म्हणजे भारताची सलामीवीर यशस्वी जैस्वाल आता एका स्थानाच्या झेप घेत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचण्यात यशस्वी ठरली आहे. त्याचे रेटिंग आता ७९० आहे. दरम्यान, इंग्लंडच्या हॅरी ब्रूकला एक स्थान गमवावे लागले आहे. तो आता ७७८ रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. उस्मान ख्वाजानेही न खेळता एक स्थान वर आला आहे. तो आता सातव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर पोहोचला आहेत. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे पाकिस्तानचा उदयोन्मुख फलंदाज सौद शकीलने एकाचवेळी २० स्थानांनी झेप घेतली आहे. त्याचे रेटिंग थेट ७२४ वर गेले आहे. न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रनेही आठ स्थानांची प्रगती केली असून तो आता ७११ च्या रेटिंगसह १० व्या क्रमांकावर पोहोचला आहे. ऋषभ पंत आणि विराट कोहलीचे मोठे नुकसान दरम्यान, भारतीय संघाचा स्टार यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतची ५ स्थानांनी घसरण झाली आहे. आता तो टॉप १० मधून बाहेर पडून थेट ११ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. विराट कोहलीनेही एका झटक्यात ६ स्थानावरून ६८८ च्या रेटिंगसह १४ व्या क्रमांकावर गेला आहे.



**मुंबई :** वडाळा विधानसभा महाविकास आघाडीच्या शिवसेना उमेदवार श्रद्धा जाधव यांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी खासदार अनिल देसाई, शिवसेना सचिव आदेश बांदेकर, युवासेना कार्यकारिणी सदस्य पवन जाधव, शैलेश साळवी सर, व महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माझगाव डॉक दक्षता सप्ताहाला उत्साहात प्रारंभ

## ३ नोव्हेंबरपर्यंत विविध उपक्रमांनी रंगणार सप्ताह



प्रतिनिधी

■ मुंबई

माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (एमडीएल ) माझगाव येथे २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत 'दक्षता जनजागृती सप्ताह २०२४' (VAW-24) मोठ्या उत्साहात आणि समर्पणाने साजरा होत आहे. २८ ऑक्टोबर रोजी, संजीव सिंघल, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी एमडीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सचोटीची शपथ देऊन दक्षता जागरूकता सप्ताहाचे उद्घाटन केले. या गंभीर कृतीने संस्थेतील सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करण्यासाठी एमडीएलच्या नेतृत्वाची अतूट बांधिलकी दर्शविली आहे. याव्यतिरिक्त, त्यांनी इन-हाउस व्हिजिलन्स जर्नलच्या नवीनतम आवृत्तीचे अनावरण केले "सुचरिता-खंड. XXVII," दक्षता आणि नैतिकतेच्या संदर्भात ज्ञान आणि अंतर्दृष्टी सामायिक करण्याच्या महत्त्वावर जोर दिला

समारंभादरम्यान, CMD/ MDL, संजीव सिंघल आणि हरी नारायण जांगीड, MDL चे मुख्य दक्षता अधिकारी (CVO) यांनी MDL कर्मचाऱ्यांना संबोधित केले. त्यांनी वर्षाच्या मध्यवर्ती थीमवर प्रकाश टाकला: "राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती, सत्यनिष्ठा की संस्कृती से राष्ट्र की समृद्धि" ही थीम भ्रष्टाचाराचा सामना करण्यासाठी आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठी समर्पित राहण्याची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करते. संपूर्ण आठवडाभर, मुख्य दक्षता अधिकारी आणि त्यांच्या टीमने एमडीएल कर्मचाऱ्यांना दक्षता आणि सचोटी वाढवण्यासाठी अनेक कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमांमध्ये प्रतिबंधात्मक दक्षता या विषयावरील प्रशिक्षण सत्र, VAW-24 च्या थीमवर एक स्किट, ऑनलाइन प्रश्नमंजुषा, निबंध लेखन, स्लोगन लेखन आणि पोस्टर स्पर्धा यांचा समावेश आहे.

# वरळीमधून महायुतीचे उमेदवार मिलिंद देवरा यांच्याकडून शेवटच्या दिवशी अर्ज दाखल




प्रतिनिधी

■ मुंबई

शिवसेनेचे खासदार मिलिंद देवरा यांनी मंगळवारी वरळी विधानसभा मतदार संघात महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुतीतील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, 'आरपीआय'च्या हजारो कार्यकर्त्यांनी प्रचंड रॅलीतून जोरदार शक्तिप्रदर्शन केले. यावेळी शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना सचिव किरण पावसकर, अॅड. सुशीबेन शाह, माजी नगरसेवक दत्ता नरवणकर उपस्थितीत होते.

मिलिंद देवरा हे शिवसेनेचे राज्यसभेचे खासदार आहेत. वरळी हा मुंबईतील कॉस्मोपॉलिटन मतदार संघ आहे. या मतदार संघ आहे. वरळीतील स्थानिक नागरिकांचे व्हीजन हेच मुख्यमंत्री एकनमाथ शिंदे यांचे व्हीजन आहे असे खासदार देवरा म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वत: या मतदार संघाचे उमेदवार आहेत. वरळीकर जनता आणि मुख्यमंत्री यांच्यातील आपण एक माध्यम आहोत, अशी भावना खासदार देवरा यांनी व्यक्त केली. ही लढाई कोणाला पराभूत करण्यासाठी नाही तर वरळीकरांना विजयी करण्यासाठी असल्याचे देवरा म्हणाले.

लोकांच्या प्रेमामुळे दोन वेळा लोकसभेवर गेलो. दक्षिण मुंबई आणि मुंबई ही माझी जन्मभूमी आणि कर्मभूमी असल्याने वरळीकरांचे काम करण्यासाठी सदैव उपलब्ध असल्याचे ते म्हणाले. सामान्य मुंबईकरांसमोर सर्वात मोठी समस्या घराची आहे. ती सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मागील दोन वर्षांत अनेक निर्णय घेतले. घाटकोपरमधील रमाबाई नगर, वरळीतील बी.डी.डी चाळींचा पुनर्विकासाचा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी मार्गी लावला, असे खासदार देवरा म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, वरळीकरांचा, सर्वसामान्य मुंबईकरांचा आणि महाराष्ट्रातील जनतेचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर खूप विश्वास आहे. मागील पाच वर्षात इथून निवडून गेलेला आमदार मतदार संघात फिरकला नाही. या ठिकाणी त्यांचे साधे कार्यालय नव्हते. मी वरळीकरांना न्याय देण्यासाठी आलेलो आहे. माझी कोणाशीही व्यक्तिगत दुश्मनी नाही. वरळीकर विकासापासून वंचित आहेत. वरळीकरांचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले नाही. त्यांच्या समस्या, आकांक्षा समजून त्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पोहचवण्यासाठी मी इथ आलोय. 20 नोव्हेंबर रोजी मतदारांनी पाच मिनिटे मुख्यमंत्र्यांसाठी काढावीत, त्याबदल्यात मुख्यमंत्री तुम्हाला त्यांच्या आयुष्यातील पाच वर्ष देतील, असा विश्वास देवरा यांनी यावेळी व्यक्त केला.



**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या सायन हिंद स्मशानभूमीतील कामगारांना समाजसेवक विनय घटानी यांच्यावतीने दिवाळीनिमित्त मिठाई तसेच ड्रायफ्रूट चे वाटप करण्यात आले

## पोलिसाला धक्काबुक्की करणाऱ्यांविरोधात गुन्हा

■ मुंबई

नियमबाह्य पद्धतीने रस्त्यावर उभ्या केलेल्या वाहनावर कारवाई केल्याच्या रागातून दोन तरूणांनी पोलिसाला धक्काबुक्की केल्याचा प्रकार अंधेरी परिसरात घडला. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरोधात अंधेरीमधील डी. एन. नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्याविरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, पोलिसासोबत वाद घालणे आदी विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस याप्रकरणी तपास करीत आहेत.

अंधेरीमधील जे. पी. रोड, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, वाडिया महाविद्यालयाजवळ रविवारी ही घटना घडली. पोलीस शिवाई प्रमोद बाबासाहेब पालवे डी. एन. नगर पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. वाडिया हायस्कूलजवळ रविवारी दुपारी काही वाहने बेकायदेशीरपणे उभी करण्यात आली होती. या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता.त्यामुळे प्रमोद पालवे यांनी तेथे वाहनचालक सचिन यादव आणि प्रकाश हालीकडे यांना तेथून वाहने काढण्यास सांगितले. सचिन आणि प्रकाशने पालवे यांच्याशी वाद घातला. तसेच त्यांना धक्काबुक्की केली .



**मुंबई :** मुंबईतील भांडुप खिंडीपाडा येथील आर के श्री सिद्धिविनायक मंदिर सेवा समितीच्या वतीने मुख्य विश्वस्त रमेश खानविलकर यांनी काल कार्ला आदिवासी पाडा येथे किमान १०० घरात दिवाळीनिमित्त मिठाई व वस्त्रदान केले.

# मध्य रेल्वेने दक्षता जनजागृती सप्ताह-2024 केला साजरा

## महाव्यवस्थापकांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सचोटीची शपथ दिली



सुनील शिंदे

■ मुंबई

धरमवीर मीना, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी दि. २८.१०.२०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे मध्य रेल्वेवरील दक्षता जागरुकता सप्ताह-२०२४ च्या प्रारंभानिमित्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सचोटीची शपथ दिली. संस्थेसाठी काम करताना सचोटी आणि पारदर्शकता राखण्याची शपथ आणि देशाचे नागरिक म्हणून सचोटी आणि प्रामाणिकपणा राखण्याची प्रतिज्ञा महाव्यवस्थापकांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिली. मध्य रेल्वे २८ ऑक्टोबर २०२४ ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत "राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती" या थीमसह दक्षता जनजागृती सप्ताह पाळत आहे.

या वेळी प्रभात रंजन, अतिरिक्त महाव्यवस्थापक, प्रधान विभागाध्यक्ष, वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक आणि मुख्य दक्षता अधिकारी, मध्य रेल्वे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मुंबई विभाग, मध्य रेल्वे मुख्यालय आणि मुंबई विभागातील इतर अधिकारी आणि कर्मचारी एकात्मता प्रतिज्ञा घेण्यासाठी उपस्थित होते. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रतिज्ञा घेतली की, ते सदैव सचोटीचे सर्वोच्च मानक राखतील आणि कोणत्याही भ्रष्ट पद्धतींचा भाग होणार नाहीत.

विविध विभागांचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि विविध कार्यशाळांचे मुख्य कार्यशाळा व्यवस्थापक यांनी मध्य रेल्वेवरील संबंधित विभाग आणि कार्यशाळांचे अधिकारी व कर्मचारी यांना सचोटीची प्रतिज्ञा दिली.

# दहिसर मधून विनोद घोसाळकर यांनी भरला उमेदवारी अर्ज



प्रतिनिधी

■ मुंबई

दहिसर विधानसभेचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार, माजी आमदार आणि शिवसेनेचे उपनेते विनोद घोसाळकर यांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या आधी विनोद घोसाळकर यांनी भव्य रॅली काढून मोठे शक्ती प्रदर्शन केले.

यावेळी महाविकास आघाडीचे सर्व नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

या रॅली मध्ये शिवसेनेचे माजी आमदार विलास पोतनीस, माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर, माजी नगरसेवक हर्षद कारकर, विभागप्रमुख उदेश पाटेकर, सुजाता शिंगाडे, काँग्रेसचे भूषण पाटील, संदेश कोंडविलकर, अशोक सूत्राले, आपचे संदीप मेहता, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे दिलीप चव्हाण, अनिल गायकवाड, विजय शिरोडकर आणि समाजवादीचे रामभुवन यादव सहभागी झाले होते.

# 28 लाख दिव्यांनी उजळली अयोध्या, नवा विक्रम



**अयोध्या**

दिवाळीच्या एक दिवस आधी रामनगरी अयोध्या दिव्यांनी उजळून निघाली होती. सरयू नदीच्या 55 घाटांवर 28 लाख दिवे प्रज्वलित करण्यात आले. यासह एक नवा विक्रम निर्माण झाला. गेल्या वर्षी 22 लाख दिवे लावले होते. सीएम योगींनी राम मंदिरात पहिला दीप प्रज्वलित करून दीपोत्सवाचे उद्घाटन केले. 1600 अर्चकांनी शरयू आरती केली.

तत्पूर्वी सीता आणि लक्ष्मण यांच्यासह प्रभू राम पुष्पक विमानाने आले. योगी यांनी त्यांचे स्वागत केले. देव रथावर आरूढ झाले. योगींनी रामाचा रथ ओढला. प्रभू राम यांना रामकथा उद्यानात आणण्यात आले. येथे योगींनी रामाची आरती केली आणि राजतिलक केले. प्रभू रामाचे स्वागत करण्यासाठी कलाकार सर्वत्र नाचताना दिसत होते. रामायणातील घटनांवर आधारित शोभायात्रा रस्त्यावर काढण्यात आली होती. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनंतरचा हा पहिलाच दिपोत्सव आहे.





